


# गोदातीर समाचार

स्थापना - १९६२
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक २३० * नांदेड * बुधवार, दि. २७ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ

## मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार -मुख्यमंत्री फडणवीस







**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा नांदेड रेल्वे स्थानकावरून शुभारंभ करण्यात आला. या रेल्वे गाडीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातून ऑनलाईन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी शासन येथील गतिमान दळणवळणावर भर देत आहे. 'वंदे भारत एक्सप्रेस' ने नांदेड राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आले असून यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार उघडले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने हा शुभारंभ करण्यात आला असून या आयोजित कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना, प्रधान मुख्य परिचालन अधिकारी श्याम सुंदर गुप्ता, मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) अवनीश कुमार पांडे, विभागीय प्रबंधक हिरेश मीना आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत आहे. प्रगत देशांसारखे आरामदायक सुविधा असलेली भारतात निर्मित वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे. मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचे अंतर ९ ते ९.३० तासात पूर्ण होणार आहे. पूर्वी जालनापर्यंत धावणारी वंदे भारत आता हुजूर साहिब नांदेडपर्यंत जात आहे. या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच गाडीचे डब्बे ८ वरून २० पर्यंत वाढवण्यात आले आहे.

नांदेड हे शिख धर्मियांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, प्रवाशांना वेगवान व आरामदायी प्रवासाची अनुभूती 'वंदे भारत' एक्सप्रेसच्या माध्यमातून होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी म राठवाड्यातील जनतेचे अभिनंदनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

नांदेड येथील रेल्वे स्थानकावर आयोजित कार्यक्रमप्रसंगी खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. विक्रम काळे, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहनिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक सत्यप्रकाश, विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले, गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदरसिंघजी, पत्रकार, नागरिक आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित नागरिक व प्रवाशांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण होते.

यावेळी बोलताना खा. अशोक चव्हाण म्हणाले की, नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा आज नांदेड रेल्वे स्थानकावरुन शुभारंभ झाला. ही रेल्वे गाडी म्हणजे विकसित महाराष्ट्राच्या प्रगतीचे पहिले पाऊल आहे. या गाडीचा वेळ अजून कमी केला तर सात तासात ही गाडी मुंबईला पोहोचेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरू केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विन वैष्णव व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. वंदे भारत एक्सप्रेस ही नांदेडकरांसाठी अमुल्य भेट असून सर्व सोयीसुविधा या गाडीत आहेत. प्रवाशांनी या रेल्वेचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आ. विक्रम काळे यांनी नांदेड येथून बिदर व लातूर येथे रेल्वे लवकरच सुरु व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करून नांदेड येथून वंदे भारत एक्सप्रेस सुरु झाल्याबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

गोदातीर समाचार



### आज श्री गणेश चतुर्थी

आज श्री गणेश चतुर्थी, गणेशोत्सवानिमित्त आमचे वाचक, जाहिरातदार, एजंटांसह सर्व गणेशभक्तांना हार्दिक शुभेच्छा!

–संपादक

## आजपासून गणेशोत्सवाला सुरुवात; सार्वजनिक मंडळांसह घरोघरी गणेशाची प्रतिष्ठापना



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात आजपासून (दि. २७) गणेशोत्सवाला शहनाई, बँड आणि ढोल-ताशांच्या सुरांनी सुरुवात होत आहे. शहरासह जिल्ह्यात श्री गणेशाची स्थापना होणार आहे. यावर्षी चांगला पाऊस झाल्याने पाणी साठवणूक आणि पिकांच्या पेरणीनेही विक्रम मोडले आहेत, त्यामुळे प्रत्येकांमध्ये उत्साह वाढला आहे. सार्वजनिक गणेश मंडळांनी त्यांच्या मंडळांमध्ये गणेशाचे वेगवेगळे देखावे सादर करण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

यावर्षी, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत, ज्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनवलेल्या मूर्तींऐवजी मातीच्या मूर्तींचा वापर करणे समाविष्ट आहे.

### स्वागत गणरायाचे राज्य उत्सव महाराष्ट्राचा

या वर्षीचा गणेशोत्सव हा महाराष्ट्र शासनाने यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सव म्हणून घोषित केल्याने विशेष आनंद आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते. आता यावर्षीचा गणेशोत्सव प्रथमच राज्यउत्सव म्हणून साजरा होणार आहे. महाराष्ट्रात आणि देशभरात गणरायाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू झाली असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच घरगुती गणेश मूर्तींच्या प्रतिष्ठापणेसाठी आकर्षक मुर्तिची निवड व सजावट देखावे पुजा तयारी सुरू आहे.

## जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाची परवानगी न्यायालयाने नाकारली; नवी मुंबईचा पर्याय

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. मराठा आरक्षक आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आरक्षणासाठी आंदोलनाची हाक दिली आहे. मनोज जरांगे पाटील यांचं आंदोलन मुंबईतील आझाद मैदानावर होणार होतं. मात्र उच्च न्यायालयानं मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानावरील आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. आझाद मैदानाऐवजी सरकार या आंदोलनाला नवी मुंबईमध्ये परवानगी देऊ शकते असं न्यायालयानं म्हटलं आहे.

## उमरी दुहेरी हत्या प्रकरण: मुलगी आणि तिच्या प्रियकराचा खून करणाऱ्या वडील, काका आणि आजोबाला पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी तालुक्यातील गोळेगाव शिवारात आपल्या मुलीचा आणि तिचा प्रियकराचा खून करणाऱ्या वडील, आजोबा आणि काका या तिघांना न्यायालयाने पोलीस कोठडीत पाठविले आहे.

उमरी तालुक्यातील बोरजुणी येथील बालाजी भंडारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्याचा भाऊ लखन भंडारे आणि त्याची प्रेयसी संजीवनी कमळे यांचा खून संजीवनीचे आजोबा लक्ष्मण पिराजी सुरणे, वडील मारोती लक्ष्मण सुरणे आणि काका माधव लक्ष्मण सुरणे या तिघांनी केला आहे. ही घटना २५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री २ ते ३ वाजेदरम्यान गोळेगाव ते बोरजुन्नी या पाऊल वाटेवर गोळेगाव/करकाळा शिवारात घडली. दोघांना मारहाण करून, दोघांना बांधून त्यांना विलास बापुराव कदम यांच्या शेतातील विहिरीत फेकुन दिले होते.

एक वर्षापुर्वी संजीवनीचे लग्न सुदेश सोबत झाले होते. परंतु तिचा प्रियकर लखन भंडारेसोबत प्रेम संबंध कायम होते. दि. २४ ऑगस्ट रोजी आपल्या सासरवाडीत कोणी नाही हे पाहून संजीवनीने लखन भंडारेला गोळेगावला बोलावले. हे बाब तिच्या सासरच्या मंडळींना कळल्यानंतर नंतर संजीवनीच्या वडीलांना बोलावण्यात आले. तिला आणि तिच्या प्रियकराला सोबत घेवून जाताना त्यांचा खून करण्यात आला.

याप्रकरणी उमरी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार संजीवनीचे आजोबा लक्ष्मण पिराजी सुरणे, वडील मारोती लक्ष्मण सुरणे आणि काका माधव लक्ष्मण सुरणे यांना अटक झाली. सहायक पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी या तिघांना न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने या तिघांना तिन दिवस पोलीस कोठडीत पाठविले आहे.


## मराठा आरक्षणाचा अजून एक बळी, रेल्वेसमोर येऊन युवकाची आत्महत्या



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील भानपूर येथील संतोष विक्रम घोगरे यांनी मराठा आरक्षण समाजाला आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी मंगळवारी सकाळी ७.३० ते ८ वाजेच्या दरम्यान एका रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केली.

भानपूर येथील तरुण संतोष विक्रम घोगरे (वय २९) यांनी सरकारकडून मराठा समाजाला हक्काचं आरक्षण न मिळाल्यामुळे उद्विग्न होऊन वाणेगाव रेल्वे स्टेशन येथे रेल्वेसमोर येऊन आपल्या आयुष्याचा दुर्दैवी अंत केला आहे.

मयत संतोष घोगरे यांच्या पार्थिवावर मंगळवार दि.२६ ऑगस्ट रोजी दुपारी भानपुर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी संतोष घोगरे यांच्या वडिलांच्या फिर्यादीवरून लिंबगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे करत आहेत.




# कै. बळवंतराव चव्हाण व कै. खा. वसंतराव चव्हाण या पिता-पुत्राचे काम अतुलनीय

## खा. श्रीमंत राजे छत्रपती शाहू महाराज यांचे प्रतिपादन





**नांदेड (मनोहर कदम)–** नायगावच्या चव्हाण कुटुंबियांनी नेहमीच सर्वांना सोबत घेऊन सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एकाच छताखाली शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यात कैलासवासी आ. बळवंतराव चव्हाण व कैलासवासी खा. वसंतराव चव्हाण यांचे कार्य अतुलनीय आहे, असे प्रतिपादन खा. श्रीमंत राजे छत्रपती शाहू महाराज यांनी केले. दि. २६ ऑगस्ट रोजी नायगाव येथे स्व. आ. बळवंतराव चव्हाण व स्व. खा. वसंतराव चव्हाण या पिता-पुत्राच्या पुतळा अनावरण समारोहात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री कमलकिशोर कदम हे होते तर उद्घाटक म्हणून खा. श्रीमंत राजे छत्रपती शाहू महाराज हे होते. यावेळी व्यासपीठावर माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, आ. अमित देशमुख, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन कपकाळ, महाराष्ट्र प्रभारी कुणाल चौधरी, खा. रवींद्र चव्हाण, माजी आ. शब्बीर अली, आ. विश्वजीत कदम, खा. कल्याण काळे, खा. सुरेश शेटकर, खा. शिवाजीराव काळगे, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा.डॉ. अजित गोपछडे, खा. शोभा बच्छाव, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी मंत्री माणिकराव ठाकरे, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, खा. चंद्रकांत हांडोरे, माजी आ. ईश्वर भोसीकर, खा. सुरेश शेटकर, खा. कल्याणराव काळे, आ. विक्रम काळे, माजी आ. शंकरअण्णा धोंडगे, माजी आ. श्याम सुंदर शिंदे, माजी खा. तुकाराम रेंगे पाटील, माजी आ. अमरनाथ राजूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी कै. बळवंतराव चव्हाण आणि कै. खा. वसंतराव चव्हाण यांनी कार्य केले. ते स्वाभिमानी होते, असे त्यांनी सांगितले. आजोबा आणि वडिलांचा विकासाचा वारसा पुढे न्यावा, ज्या कार्यकर्त्यांवर अन्याय होत असेल त्यांच्या पाठीशी खंबीरपणे तुम्ही उभे रहा असे त्यांनी खा. रवींद्र चव्हाण यांना म्हणाले. अगदी कमी वेळेत तुम्ही खासदार झालात हे तुमचे भाग्यच म्हणावे लागेल. पक्षाशी प्रामाणिक राहून ज्यांच्यावर अन्याय होईल, त्यांच्यासाठी आपण लढा द्या यश तुमच्या सतत सोबत राहील दोन्ही पुतळे नांदेड जिल्ह्यासाठी प्रेरणा देणारे आहे, असे कदम म्हणाले.

### राहुल गांधी यांचा संदेश

पुतळा अनावरण सोहळ्याचे निमंत्रण काँग्रेसचे नेते राहुल गांधी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांना दिले होते, परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे ते या कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत. परंतु त्यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा संदेश पाठविला आहे. यावेळी खासदार रविंद्र चव्हाण यांनी राहुल गांधी यांचा संदेश वाचून दाखवला.

यावेळी खा. अशोकराव चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना स्व. बळवंतराव चव्हाण, स्व. पद्मश्री श्यामराव कदम यांच्यापासूनच्या स्मृतींना उजाळा देताना खा. स्व. वसंतराव चव्हाण यांच्या बरोबरच्या आठवणी कथन केल्या. आज पक्षीय व्यासपीठ वेगवेगळे असले तरी आम्ही सर्व एका कुटुंबातील आहोत. हे नाते असेच घट्ट राहणार आहे. नांदेडच्या पर्यायाने मराठवाड्याच्या विकासासाठी सर्वांच्या साथीने प्रयत्न करीत राहू, अशा भावना व्यक्त केल्या.

यावेळी खा.स्व. वसंतराव चव्हाण यांच्या चरित्रावर आधारित 'वसंतगाथा' हा ग्रंथ छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. ग्रंथाचे संपादक संजीव कुळकर्णी यांनी मोजक्या शब्दात ग्रंथ प्रकाशनाचे औचित्य कथन केले.

वसंतगाथा ग्रंथाचे संपादक संजीव कुळकर्णी, ग्रंथाची मांडणी व सुबक छपाई करणारे शिवानंद सुरकुटवार, मूर्तीकार मोरवंचीकर यांचा सत्कार छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते सर्व मान्यवरांच्या उस्थित करण्यात आला.

यावेळी माधवराव पाटील शेळगावकर, मारोतराव कवळे, शिवराज पाटील होटाळकर, संजय पाटील शेळगावकर, बबन बारसे, मनोज पाटील मोरे टाकळीकर, पूर्व प्राचार्य गोविंदराव मेथी, संजय भोसीकर, श्याम दरक, आनंद चव्हाण, केशवराव चव्हाण, श्रीनिवास चव्हाण, विजय चव्हाण, श्रीधर चव्हाण, नारायण जाधव, बाळासाहेब रावणगाकर, भुजंग पाटील डक आदी मान्यवरांसह कार्यकर्ते, पदाधिकारी व मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

गोदातीर समाचार

## वार्ताहर नेमणे आहेत

'दै. गोदातीर समाचार'साठी खालील तालुक्याच्या ठिकाणी आणि तालुक्यातील इतर गावांत वार्ताहर त्याचबरोबर वृत्तपत्र एजंट नेमणे आहेत. इच्छुकांनी दि. ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत खालील ई-मेलवर अर्ज करावेत.

०१) **नांदेड–** लिंबगाव, मरळक
०२) **मुदखेड–** मुदखेड तालुका, मुगट, निवघा,
०३) **अर्धापूर–** लहान, बारड, मालेगाव
०४) **भोकर–** भोकर तालुका, किनी, धानोरा
०५) **लोहा–** लोहा तालुका, सोनखेड, कलंबर, माळाकोळी, माळेगाव (यात्रा), मारतळा
०६) **कंधार–** कंधार तालुका, उस्माननगर, फुलवळ, पेठवडज, कौठा, बारूळ, शिराढोण, पानभोसी
०७) **मुखेड–** मुखेड तालुका, मुक्रमाबाद, बाऱ्हाळी, जांब, येवती, एकलारा
०८) **नायगाव–** नायगाव तालुका, घुंगराळा, कहाळा, बरबडा, गडगा, मांजरम, कुंटूर
०९) **बिलोली–** बिलोली तालुका, लोहगाव, कासराळी, सगरोळी
१०) **देगलूर–** देगलूर तालुका, करडखेड, मरखेल, शहापूर, हाणेगाव
११) **धर्माबाद–** धर्माबाद तालुका, करखेली, जारीकोट
१२) **उमरी–** उमरी तालुका, सिंधी, वाघलवाडा, ढोल उमरी
१३) **हदगाव–** हदगाव तालुका, तामसा, पळसा, मनाठा, निवघा बाजार, आष्टी
१४) **हिमायतनगर–** हिमायतनगर तालुका, सरसम, पोटा, सिरंजनी
१५) **किनवट–** गोकुंदा, बोधडी, मांडवी, सारखणी, इस्लापूर, उनकेश्वर, शिवणी
१६) **माहूर–** माहुर तालुका, वाई बाजार, सावरखेड, सिंदखेड, वानोळा

संपर्क : मुख्य संपादक
दै. गोदातीर समाचार, शिवाजीनगर, नांदेड– ४३१ ६०२
फोन: ०२४६२– २५५ ७७७ / फॅक्स– २५२ २११
ईमेल: keshavgpatil@gmail.com

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# श्रीगणेश आणि सद्यस्थिती

आजपासून सर्वत्र उत्साह आणि मंगलमय वातावरणात गणेशोत्सवाचा प्रारंभ होत आहे. दरवर्षीप्रमाणे या दहा दिवसांत महाराष्ट्राच्या आणि संपूर्ण देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनात वेगळीच ऊर्जा संचारते. गणपती बाप्पाच्या आगमनाने भक्तिभाव, एकोप्याची भावना, आणि कलात्मकतेला नवे बळ मिळते. परंतु यंदाचा गणेशोत्सव केवळ पारंपरिक जल्लोषापुरता मर्यादित न ठेवता, आपल्या समाजाचे चिंतन करण्याचीही एक संधी आहे. गणपती ही केवळ एक धार्मिक प्रतिमा नसून, तो आपल्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ऋग्वेदात गणपती हा शब्द ब्रह्मणस्पतीसाठी वापरला गेला आहे. कालांतराने या संकल्पनेला अनेक परंपरांमध्ये स्थान मिळाले. महाभारतातील प्रसिद्ध कथा गणपतीने महाभारत लेखनासाठी व्यासांना मदत केली. यामुळे त्याचे 'विद्या' देवता म्हणून मानांकन अधिक दृढ झाले. वास्तविक गणपती ही संकल्पना मूळतः रुद्र किंवा शिवाशी संबंधित असल्याचे संशोधनातून दिसते. वायुपुराणात शिवाला गजमुख, लंबोदर अशी विशेषणे दिलेली आहेत. यामुळे गणपतीचे मूळ हे शिवतत्त्वात दडलेले असल्याचा दृष्टिकोन काही विद्वान मांडतात. गणपती ही आदिम बुद्धी, शक्ती आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. अशाच प्रकारची बुद्धी आणि शक्ती सर्वांना प्राप्त व्हावी या उद्देशाने हा उत्सव साजरा केला जातो. घरामध्ये पूजला जाणारा गणपती जेव्हा सार्वजनिकरित्या पूजला जातो तेव्हा त्याचे महत्त्व विशेष असते. महाराष्ट्रात अष्टविनायकांच्या रूपाने गणपतीची अनेक तीर्थस्थाने आहेत. परंतु सार्वजनिक गणेशोत्सवाची ऐतिहासिक भूमिका ही स्वातंत्र्यलढ्याच्या पृष्ठभूमीवर अधिक महत्त्वाची ठरते. लोकमान्य टिळकांनी १८९४ साली पुण्यात हा उत्सव सार्वजनिक केला आणि तो राष्ट्रीय एकतेचे व जनजागृतीचे प्रभावी माध्यम बनला. इंग्रजांनी लादलेल्या १४४ कलमामुळे भारतीयांना एकत्र येण्यास बंदी होती. त्याला टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून विरोध केला. मात्र, याहीपूर्वी १८९२ साली भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केल्याचा दावा आज मान्य केला जातो. त्यांनी ब्रिटिशांना असुररूपात दाखवणारी मूर्ती तयार करून क्रांतीचे प्रतीकच उभे केले होते. आध्यात्मिक आणि सामाजिक दोन्ही क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या संशोधनात 'ज्ञानेश्वरी'मधील षड्भुज गणपतीचे उल्लेख महत्त्वाचे मानले जातात. १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी गणेशविषयी केलेले वर्णन, म्हणजे आपल्या संस्कृतीतील गणपतीची काव्यमय आणि तत्त्वविवेचनात्मक उंची किती महान आहे, याचे द्योतक आहे. गणेश हे फक्त धार्मिक प्रतीक नसून, ते कलांचेही प्रेरणास्थान आहे. वासुदेव कामत यांच्यापासून लता मंगेशकरांपर्यंत अनेक कलाकारांनी गणेशाला वंदन केले आहे. गणपतीच्या आरत्या या केवळ भक्तिगीत नसून, शक्तिरसप्रधान काव्य आहेत. त्या देवभक्तांच्या नात्यातील जिव्हाळा आणि आत्मिक संवाद दर्शवतात. परंतु आजचा गणेशोत्सव फक्त पारंपरिक सोहळा नसावा. समाज-मनातील प्रश्नांची जाणीव जागवणारी एक चळवळ बनण्याची त्याची ताकद आहे. आज देश आर्थिकदृष्ट्या वेगाने पुढे जात असला, तरी सामाजिक आघाड्यांवर अनेक प्रश्न गंभीर आहेत. जसे रस्त्यांची दुरवस्था, अपघातांचे वाढते प्रमाण, स्त्री आणि बालकांवरील अत्याचार, गुन्हेगारांची दहशत, आणि राजकीय वातावरणातील प्रदूषण. या सगळ्या पार्श्वभूमीवर आपल्या सणांची भूमिका केवळ करमणूक किंवा साजरेपणापुरती मर्यादित राहता कामा नये. त्यातून समाजाला दिशा, विवेक आणि एकता मिळाली पाहिजे. श्रीगणेश हा केवळ विघ्नहर्ताच नाही, तर 'सिद्धिविनायक' ही आहे. त्यामुळे तो आपणांस विचारशक्ती, संवेदनशीलता आणि एकात्मतेचा मार्ग दाखवतो. गणेशोत्सव हे ग्रंथोपासनेचे, चिंतनाचे आणि एकात्मतेचे पर्व असावे. गजानन हा बुद्धीचे प्रतीक आहे. त्यामुळे समाजमाध्यमांत गढून गेलेल्या तरुण पिढीने गणेश चतुर्थीचा मुहूर्त साधून पुन्हा वाचनाकडे वळावे, असे आवाहन करता येते. या उत्सवातून समाज प्रबोधन होणे गरजेचे आहे. यात पैशाचा उपयोग नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे ते भरून काढण्यासाठी त्यांना मदत करता येईल. त्याचप्रमाणे वाढते सामाजिक द्वेषाचे वातावरण आणि राजकीय अशांतता याला उत्तर म्हणून गणेशभक्तांनी सजग नागरिकत्त्व स्वीकारायला हवे. 'श्रीगणेशा' म्हणजे शुभारंभ. आणि तो शुभारंभ केवळ उपासनेपुरता न ठेवता, सामाजिक परिवर्तनाची सुरुवात ठरावा, हीच खरी बाप्पाच्या चरणी अर्पण केलेली साद असेल. अखेर एवढीच प्रार्थना की या देशाला आणि समाजाला गणपती बाप्पा सद्बुद्धी देवो. तसेच त्यांना शांतता, समृद्धी आणि सुसंवादाची वाट दाखवो.

# 'गणेशोत्सव काल, आज आणि उद्या'



कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात करण्याच्या अगोदर गणेश नमन : करूनच 'आधी वंदू तुझं मोरया' म्हणून त्यांना वंदन केलं जाते. गणपती ही विद्येची,कलेची देवता आहे. हस्तकला, चित्रकला, नाट्यकला, संगीत कला स्पर्धामधून आपण कलेची उपासना करतो. वेगवेगळ्या व्याख्यानातून, ज्ञानसंवर्धन करण्याचं काम कलेतून केले जाते. गणपतीची उपासना करणे हा एक महत्त्वाचा भाग आहे. उपासना केल्याशिवाय गणपती पावत नसून ही अतिशय लोकप्रिय देवता आहे. ती पार्वतीच्या मळापासून तयार झाली आहे, अशी आख्यायिका सांगितली जाते. शिवशंकराने गणपतीचे शिर धडा वेगळे केले, आणि हत्तीचे शिर बसवून ते गजपती, गजानन, विनायक झाले. अशा पौराणिक कथा सांगितल्या जातात. गणपतीला वेगवेगळ्या भाषेत वेगवेगळी नावं आहेत. कानडीत बेनकन, तेलगूमध्ये पिलेल्यर चवती आणि तामिळमध्ये तुंबिकाई अलवर तर महाराष्ट्रात गणेश, गणपती, वक्रतुंड, विनायक, एकदंत, लंबोदर अशा नावाने ओळखले जाते. गणपतीची उपासना भारतात सर्वत्र केली जाते. गणपतीचे वाहन मूषक आहे.त्यांचे कान मोठे आहेत. कारण ऐकण्यासाठी मोठ्या कानाची गरज असते. पोट हे मोठे असल्याने कोणी काही बोललं तर पोटामध्ये साठवून ठेवण्याची क्षमता आहे, आणि डोळे बारीक कारण कोणी किती वाईट कृत्ये करत असले तरी, ते सर्व त्यांना पाहता येतात. म्हणून गणपती ही देवता सर्वांची लाडकी देवता आहे. ते घरोघर पुजली जाते.

महाराष्ट्रात अष्टविनायके प्रसिद्ध आहेत. सिद्धटेकला सिद्धिविनायक, मोरगावचा गणनायक, पालीला बल्लाळेश्वर, महडला विनायक, थेऊरला चिंतामणी, लेण्याद्रीला गिरीजात्मक, ओझरला विघ्नेश्वर, रांजणगावचा महागणपती अशी अष्टविनायके सर्वत्र वंदनीय, पूजनीय आहेत. त्यामुळे युगानयुगे गणपती या लोकप्रिय देवतेची आरती करून मनोभावे पूजा पाठ-करून दहा दिवस वेगवेगळे विधायक सामाजिक उपक्रम राबवून अनंत चतुर्थीला विसर्जित केले जाते.

आज २७ ऑगस्टपासून गणरायांचे सर्वत्र आगमन होत आहे. आज गावोगावी धुमधडाक्यात वाजत-गाजत मिरवणूक काढून श्रीची स्थापना केली जाते. नयनरम्य देखावा, दिव्यांचा झगमगाट, सर्वत्र आनंदी आनंद वातावरण, रंगीबेरंगी बेगड, आरस आरतीसाठी कापुराचा घमघमाट, हिरवीगार दूर्वा, प्रसाद म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे गोड उकडलेले, तळलेले मोदक. सर्वच काही गणपतीसाठी आहे.

अनेक गाड्यांचे रिझर्वेशन करून लोक आपल्या गावाकडे जाण्यासाठी तयारीत आहेत. त्यासाठी काही महत्वाच्या गोष्टी जाणून घेणेही आवश्यक आहेत.

इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला लवकर सोडवायचे असेल तर सर्वांना एकत्रित आणण्यासाठी एखादा धार्मिक कार्यक्रम घ्यावा, म्हणून लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली. त्यामुळे लोक एकत्रित येत असत. त्यातून राष्ट्रीय एकात्मतेची बीजे रोवली गेली. ज्यामुळे एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण सुरू झाली. देव-देवतांचे भजन करण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्रित येत आहोत. असे इंग्रजांना कळविले गेले. पण याचा खरा अर्थ वेगळा होता, जो समाज एकसंघ असतो. त्या समाजावर बाहेरील व्यक्तीची हुकूमत जास्त दिवस चालत नाही.

सुरुवातीच्या काळात खेडोपाडी सर्वत्र दीड दिवसाचा गणपती बसवला जात असे. आम्ही घरी मातीचा गणपती तयार करून प्राणप्रतिष्ठा पुज्यभावनेतून करत. गावातील वारकरी संप्रदाय भजनी मंडळ गणपतीच्या पुढे अतिशय सुंदर असे भजन केले जात असत. त्यामुळे त्यांच्या कलेला वाव मिळत असे.आपल्या मनातील इच्छा हे गणरायाला सांगितल्या जात, आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव होत होते. त्यानंतर समाज सुशिक्षित झाला. गणेशोत्सव दहा दिवस सुरू झाले. व्याख्यानमाला सुरू झाल्या, आणि बदल होत गेला. त्यांना व्यवसायाचे स्वरूप देण्यात आले. प्रत्येक गणेश मंडळे जास्तीत जास्त आकर्षक देखावे तयार करू लागले. वर्गणीच्या नावाने हजारो रुपये गोळा केले जाऊ लागले. त्यानिमित्ताने ढोल, ताशे, डीजे यांचा सर्व खर्च वाढला. त्यामुळे मूळ उद्देश बाजूला जाऊन हिडीस फिडीस प्रकार होऊ लागले. कर्ण कर्कश आवाज वाढवून सर्वत्र शांतता भंग होऊ लागली. आज गल्लो गल्ली, वाड्या, वस्ती, चौका-चौकात गणपती बसविले जाऊ लागले. शहरात शेकडो गणेश मंडळे नावारूपाला आली आहेत. त्यांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष ठरले. गणरायाची उंची वाढू लागली.चांगले वाईट परिणाम दिसू लागले. कोणी मनोरंजना साठी तर कोणी आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी मंडळाचा वापर करून घेऊ लागले.

मूर्ती बसवल्यानंतर त्याची योग्य वेळी आरती व्हावी? तो सन्मान सर्वांना मिळावा, त्यामुळे समानता येईल. परंतु तेच ते लोक पुढे होऊन बाकीच्या भाविकांचा विचार केला जात नाही. यामध्ये चाणाक्ष असणाऱ्या लोकांनी बरोबर लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन आपली श्रीमंती वाढवली. गणरायाला पुढे करून अनेकांनी पद्धतशीरपणे आर्थिक सुबत्ता केली. तो जागृत असून तुम्हाला पावतो. असे म्हणून अंधश्रद्धेचा फायदा करून घेतला.

विसर्जनाच्या निमित्ताने अनेक अडचणी सध्या निर्माण होतात. ज्या विहिरीत, आडात विसर्जन केले जाते. त्या ठिकाणचे पाणी खराब होते. मूर्तीमध्ये असणाऱ्या रासायनिक कलरचे दुष्परिणाम मानवी आरोग्यावर होतात. त्यामुळे त्यांचा प्राणीमात्रा वर, जलचरावर प्रत्यक्ष परिणाम होतो. बऱ्याच ठिकाणी निर्माल्य साठी सोय केली जाते, परंतु नंतर त्या मुर्ती न विरघळता तशाच राहतात. त्यानंतर इतरत्र नेऊन टाकावे लागतात. अनेक ठिकाणी गणपती विसर्जन करते वेळेस गालबोट लागते, देशात शेकडो तरुण दरवर्षी समुद्राच्या तलावाच्या पाण्यात बुडतात.

या सर्व गोष्टीचे नियोजन करूनच गणपती मंडळाने काळजीपूर्वक कार्य करावे. जेणेकरून जीवित हानी होऊ नये. गणपतीच्या या काळात सर्व विधायक कार्य केले जावे. वृक्षारोपण, बेरोजगाराच्या समस्या, समाज परिवर्तन करणाऱ्या नाटिका,सुंदर देखावे असावेत. जेणेकरून समाज प्रबोधन पर कार्यक्रम घ्यावेत. उरलेल्या पैशातून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य द्यावे. दिव्यांग, मूकबधिर, कर्णबधिर मतिमंद, अनाथ गरजू विद्यार्थ्यांना मदत करावी. परंतु मूळ उद्देशा पासून दूर जाऊ नये.आता समाज सुशिक्षित होऊन छोट्या छोट्या गोष्टींसाठी वादविवाद निर्माण करत आहे. अनेक लोकावर प्रत्यक्ष पोलीस कार्यवाही होत आहे. परत पाच पाच वर्ष त्यांना हद्दपार केले जाते. शिक्षा सुनावल्या जातात, आणि आयुष्य वाया जाते. परंतु त्यानुसार आपण वागतो का? खरंच वागत असाल तर महिलावर एवढा अन्याय,अत्याचार का होतात? दहशतवाद, नक्षलवाद, समाजवाद, वसाहतवाद, प्रदेश वाद, अपहरण, अफरातफर का केली जाते. असे अनेक प्रश्न सध्या भेडसावत आहेत. या निमित्ताने आपण सर्वत्र एकत्र येतो. त्यातून विधायक कार्य साधले जावे. बालविवाह रोखले जावेत, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले जावेत, पाणी प्रश्न, जंगलाला लागणाऱ्या आगी, बेरोजगारांच्या समस्या, लोकसंख्या वाढ,अपघाताचे वाढलेले प्रमाण, भ्रष्टाचार थांबवणे ही काळाची गरज आहे. पुढील काळात म्हणजे उद्याच्या काळातील गणपती बसविणारा समाजात अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. जागेअभावी वाद निर्माण होणार. मोठमोठे गणपती बसवण्यासाठी वर्गणी वाढवणार त्यातून एकमेकांची मने क्लुशीत होणार. सगळ्यात मोठा गणेशोत्सव पुण्यात होतो, वाजवीपेक्षा जास्त गणेश मंडळे झाल्यामुळे त्याचे दुष्परिणाम वाढत आहेत.

विसर्जन करण्यासाठी दोन दोन दिवस लागणार आहेत. गणेशोत्सवाच्या काळात व्यसनाधीन लोकांची संख्या वाढणार आहे. प्रत्येकजण घराच्या समोर ओट्यावर एक गणपती बसवेल. असे वातावरण निर्माण काही वर्षांनी तयार होणार आहे? सध्या ज्याला आपण चौक म्हणतो. दरवर्षी गणेशोत्सवातून चांगल्या गोष्टी जर शिकत गेल्या तर चोरीचे प्रमाण कमी व्हावे. सन्मार्गांने सगळे जण चालावेत. तुरुंगातील कैद्यांची संख्या कमी व्हावी, आपण सुशिक्षित आहोत. हे विसरू नये. वाईट घडणार नाही. आम्ही तुमच्यापेक्षा मोठे आहोत. हे दाखवून देण्यासाठी गणेशोत्सवाचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे. काही वर्षांपूर्वी गणपती दूध पीत आहे, असे सांगून अंधश्रद्धेचा कळस गाठला होता. पुढील काळात ही भयानक परिस्थिती निर्माण होईल? वर्गणीसाठी बळजबरी करून काढून घेतली जाईल.असे माझे स्वतःचे वैयक्तिक मत आहे. याला जबाबदार कोण असेल? आता तर हा उत्सव राज्यत्सवझाला आहे. एका बाजूला काही गोष्टी चांगल्या असल्या तरी दुसऱ्या बाजूला दुष्परिणाम जास्त जाणवत आहेत. रात्रभर तरुण मुले जागत आहेत.

हे मात्र खरे हे गजानना गणराया सर्वांना तू चांगली बुद्धी दे. सर्वावर कृपा कर जेणे करून विसर्जना वेळी पाण्यात कोणीलाही बुडू देऊ नको. तू विघ्नहर्ता आहेस. सध्याची तरुण पिढी काही प्रमाणात बिघडली आहे. तिला सुधारण्यासाठी थोडी बुद्धी देण्याचा प्रयत्न कर.आणि तू दुखहर्ता आहेस, सर्वांना सद्बुद्धी दे. वेळेवर पाणी पाऊस पडू दे.

चला तर मग आता... पार्वतीच्या बाळा। तुझ्या पायात वाळा। ताशांचा आवाज ।तरारा झाला ।गणपती माझा नाचत आला।। गणेश चतुर्थीच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा. गणपती बाप्पा मोरया। मंगलमूर्ती मोरया.।आला रे आला। गणपती आला।।

-प्रा. विठ्ठल बरसमवाड
अध्यक्ष : विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी, ता. मुखेड, जि. नांदेड

# महान पार्श्वगायक मुकेश

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांचा स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते. ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या.

मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते. त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपटसृष्टीचा



आवाज बनेल असे ते त्यांच्या आई-वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता.

१९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली.

राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# वाचनसंस्कृती आणि आजची पिढी

शहरात वा खेड्यात वास्तव्य करणाऱ्या बहुतेकांना कोणते ना कोणते मादक पदार्थ सेवन करण्याची सवय लागलेली आहे. त्यातच दारू, गांजा, तंबाखू, सिगारेट यांसारख्या शरीराला घातक असलेल्या पदार्थाचे सेवन अत्यंत घातक आहे. कालपरवा नांदेड जिल्ह्यातील खेड्यात वास्तव्य करणाऱ्या वृद्ध व्यक्तीचा फोन आला.त्यांनी तरुण व्यक्तीविषयी एक खंत व्यक्त केली की, आजचे तरुण व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत त्यांना उद्बोधन होईल असं लेखन आपल्याकडून अपेक्षित असल्याचे सुचविण्यात आले. त्यामुळे या विषयावर लेखन करणे आवश्यक गरज बनली आहे हे मनात ठरवून लिहायला लागलो. वृद्ध व्यक्तीने मादक पदार्थ वा चाय पिण्यापेक्षा वर्तमानपत्र विकत घेऊन वाचन संस्कृती रुजवत असल्याने मला अत्यंत आनंद झाला. आज सोशल मीडियाचा युग आला असल्याने वाचन संस्कृतीपासून तरुण-तरुणी दुरावत असल्याचे चित्र दिसून येते. जुनी पिढी अजूनही ऑफलाईन दुनियेच्या वस्तुस्थितीत व व्यसनाच्या दूर राहून जीवन व्यतीत करीत असल्याचे दिसून येते.

कामगार, मजूर, शेतमजूर शारीरिक कष्ट करून सायंकाळी नशेच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. शारीरिक कष्ट करणारी व्यक्ती जास्तीत जास्त दारूच्या नशेत पैशाचा अपव्यय करीत असल्याने त्यांच्या संसारावर विपरीत परिणाम होत आहे. दारू पिणाऱ्या व्यक्तीला त्याचा दुष्परिणाम लक्षात येत नसला तरी कौटुंबिक व सामाजिक परिणाम अतिप्रमाणात होत असल्याने आई-वडील, पत्नी, मुले यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे, म्हणून मादक पदार्थाचे सेवन करण्याऐवजी मुला-बाळांना तेवढ्याच पैशाचे खाऊ घेऊन गेल्यास घरी मुले खुश होतील. त्यामुळे संसारावर येणारा ताण दूर सारण्यासाठी दारूचे सेवन करणे टाळायला हवे. दारू, गांज्या यामुळे समाजजीवनावर होणारे परिणाम टाळण्यासाठी व संसार जोडण्यासाठी दारू सोडा, संसार जोडा असे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे.

जीवन जगत असताना बऱ्याचदा सण, समारंभ, आनंद अशा वेळी दारूचे सेवन केले जाते. मित्राच्या सहवासात असताना एकमेकांच्या आग्रहाने



आनंद व्यक्त करण्याच्या नादात एकच प्याला म्हणून घेतलेला घातक ठरत असतो. हळूहळू शरीराला त्याची सवय होत जाते. दारू, गांज्या यांसारख्या मादक पदार्थामुळे नशा येऊन त्याचा यकृतावर परिणाम जाणवू लागतो.ही एक प्रकारची लत असून प्रथमतः आपण दारूला पीत असतो नंतर संपूर्ण शरीर अल्कोहोलिक होऊन शरीरच दारूची मागणी करीत असल्याने मादक पदार्थापासून दूर जाणे अवघड होते. तरीदेखील दारूपासून मुक्ती मिळविणे अशक्य नाही, कारण दारूचे सेवन करणे व वर्ज करणे अखेर स्वतःच्या मनावर अवलंबून असते. दारूचे सेवन करीत असल्याने दिवसभर काम केल्यावर आलेल्या पैशाचा संसारासाठी वापर न करता दारूच्या पाण्यापायी पैशाची उधळण करीत असतो. त्यामुळे कित्येक संसार उघड्यावर पडलेले असून त्यांचे कुटुंबातील सदस्य उपाशी झोपतात. असे कितीतरी कुटुंब त्यांच्या एका व्यक्तीच्या दारू पिण्यामुळे मुलं देखील वाईट व्यसनाकडे वळलेले आहेत. त्यामुळे गुन्हेगारी, चोरी, खून यांसारख्या वाईट गोष्टींकडे वळलेले आहेत. तसेच वडील दारूच्या नशेत असल्याने शिक्षण अर्धवट सोडून बालमजुरी करावी लागत असल्याचे विचित्र चित्र दिसत असल्याने दारू सोडा...संसार जोडा असं आर्जवपणे म्हणावे लागते आहे.

खेड्यात असो वा शहरात काम केल्यानंतर दिला जाणारा मोबदला देतो म्हटले तरी मजूर मिळणार नाही पण दारू द्यायला तयार झाले की, कोणतेही काम करायला तयार होणारे बघितले आहे. दारू पिण्यासाठी पैसा उपलब्ध नसला तर घरातील वस्तू विकून आपली दारूची नशा पूर्ण केली जाते. दारू पिऊन घरातील व्यक्तीला नको त्या शब्दात बोलल्या जाते. एवढेच नाही तर पत्नी, मुलांवर हात उगाळला जातो. नशेत असलेल्या व्यक्तीला भान नसल्याने होणारे नुकसानही कधीही न भरून निघणारी पोकळी आहे. एका व्यक्तीच्या सेवनाने इतरांवर होणारा अनिष्ट परिणाम हा घातक असतो. आपण ज्या ज्या परिसरात वास्तव्य करीत असतो त्या ठिकाणी अशी नानाविध व्यक्ती बघायला मिळत असते. दारूच्या नशेत व रागाच्या भरात बायको, मुलांचा खून करण्यास देखील मागे-पुढे बघत नाही त्यामुळे कुटुंबाची वाताहात निर्माण होते.

दारूच्या आहारी जाऊन स्वतःचे जीवन संपवितात. त्याचसोबत त्यांच्याशी निगडित असलेल्या नात्यांचा देखील विश्वास गमवित असतो. अखेर पिण्यासाठी पैसे नसले तर पत्नी, मुले दवाखान्यात आजारी असल्याचे सांगून इतरांकडून पैशाची मागणी करीत असतात. त्यामुळे अश्या मादक पदार्थाचे सेवन करण्याचे व्यसन न ठेवता वाचनाचे व्यसन ठेवल्यास उचित व योग्य होईल. दारूपायी अनेक कुटुंब उद्ध्वस्त होत असल्याने अनेक सामाजिक संस्था देखील व्यसनमुक्ती केंद्र उभारून त्यांच्या कुटुंबाला नवसंजीवनी देत असल्याचे दिसून येते.

चंद्रपूर जिल्ह्यातील झेप ही व्यसनमुक्ती संघटना कार्यरत आहेत. तसेच शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना आज संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहेत. म्हणून आपल्या आजूबाजूच्या परिसरात दारूचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीला व्यसनमुक्ती संघटनेत नेऊन सुखी संसार करण्यासाठी प्रत्येकांनी पुढाकार घ्यायला हवा.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो हे सर्वांना ज्ञात आहे, म्हणूनच म्हटले जाते की, अति तिथे माती ही म्हण त्याठिकाणी चपखल बसू शकते. माझ्या गावाला तसेच अवतीभवती चोवीस तास नशेच्या आहारी राहणारे व्यक्ती देखील दारूपासून दूर झालेले आहे आणि संसाररूपी रथ सुंदररित्या सांभाळत आहेत त्यामुळे त्यांना मार्ग दाखविणारे गुरू मिळाले अन्यथा त्यांची अंतिम प्रेतयात्राच निघाली असती हे सत्य आहे.म्हणून अशी स्थिती येऊ नये, तरुणपणात जग सोडून जाणे म्हणजे पत्नीला विधवा व मुलांना अनाथ करून सोडणे होय. या पृथ्वीवर जन्माला आल्यानंतर सत्कार्य करण्याचे सौभाग्य प्रत्येकाला लाभायला हवे. यासाठी दारू या विषयुक्त नशेच्या आहारी न जाता कुटुंबाच्या प्रेमात, आपुलकीत, स्नेहात राहून कुटुंब ही संकल्पना मनात रुजवायला हवी. आज कित्येक जण नशेच्या आहारी आहेत, पण यात कोणाचेही नाव लिहिणे हे उचित वाटत नाही. प्रत्येकांनी दारूचे व्यसन न करता चांगल्या कार्याचे, गोष्टीचे व्यसन करण्यास प्रोत्साहित करायला हवे. स्वतःसाठी जगता जगता इतरांसाठी जगण्याचा कानमंत्र हाती घ्यायला हवा.गावातील तरुण एकत्र येऊन व्यसनमुक्ती संघटना स्थापन करून व्यसन करणाऱ्या व्यक्तीवर अंकुश ठेवायला हवा. गावातील कुटुंब आनंदी तर गाव आनंदी आणि गाव आनंदी तर तालुका, जिल्हा, राज्य, देश आनंदी होईल आणि दारू सोडा... संसार जोडा ही संकल्पना विस्ताराला चालना मिळेल.

-दुशांत बाबुराव निमकर
शब्दांकुर फाऊंडेशन,
गोंडपिपरी
मो. ९७६५५४८९४९

## थोडक्यात...

### दागिने उजळून देतो म्हणून महिलेस गंडविले

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील मादाळी येथे अहमदाबी इसाम शेख (वय ५२) ही घरकाम करणारी महिला दि. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास आपल्या सासुसोबत बसली होती. यावेळी त्यांच्याकडे दोन अनोळखी महिला पोहोचल्या. त्यांनी आम्ही पितळी भांडे आणि सोन्याचे दागिने उजळून देतो असे आमिष दाखवून या अहमदाबी इसाम यांना विश्वासात घेतले. पितळी भांडे आणि दागिने असा ५८ हजार रुपयांचा ऐवज उजळण्यासाठी विश्वासाने या अनोळखी दोन्ही महिलांच्या स्वाधीन केला. यावेळी पिण्यासाठी पाणी घेऊन या असे म्हणून अहमदाबी शेख या महिलेला त्यांनी घरात पाठविले असता यांची नजर चुकवून सदर महिलांनी तेथून पळ काढला. अहमदाबी शेख यांनी थेट कंधार पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या फिर्यादीवरून अनोळखी दोन महिलांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार गीते करत आहेत.

### राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा

**लोहा (प्रतिनिधी)–** भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो)चे चंद्रयान–३ मिशन दि. २३ ऑगस्ट २०२३ मध्ये यशस्वी झाले. आपल्या भारताने चंद्रावर पाऊल ठेवून मोठा इतिहास रचला. त्याच अभिमानाचे प्रतीक म्हणून डी.के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पिसाळ यांनी केले. प्रा. मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच बी–फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यींनी अंकिता सवराते, साक्षी पवळे यांनी आपले मत मांडले. बालाजी होळगीर यांनी आभार प्रदर्शन केले.

# शासकीय योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ द्या; आ. बोंढारकर यांच्या प्रशासनाला सुचना




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांना शासकीय योजनेचा जास्तीत जास्त फायदा मिळवून द्या, अशी सुचना आ. आनंदराव बोंढारकर यांनी दिली आहे. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विविध विभागाचा आढावा घेतला. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या.

यावेळी नांदेड उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, नांदेड तहसीलदार संजय वारकड, गट विकास अधिकारी आडेराघो डी.के., उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग पवार, तालुका कृषी अधिकारी भगवान तवर, कार्यकारी अभियंता एम एसईबी ग्रामीण आर.पी.चव्हाण, कार्यकारी अभियंता एमएसईबी शहर विनय घनबहादूर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रविण मुंडे, गटशिक्षणाधिकारी आडे, पुरवठा निरीक्षण अधिकारी रविंद्र राठोड, महिला व बाल विकास विभाग ग्रामीण विभाग संजय मेडपलवार, जिल्हा परिषद शाखा अभियंता घोडके, ग्रामपंचायत पुरवठा उपअभियंता देशमुख, कनिष्ठ अभियंता कुलकर्णी, मनरेगा विभाग कांबळे, फुलारी, विस्तार अधिकारी केंद्रे, कांबळे, कृषी अधिकारी देशमुख, विस्तार अधिकारी धांडे, गोरे, पशुधन विकास अधिकारी डॉ.बुन्नावार, उपकार्यकारी अभियंता एमएसईबी सुतार, विस्तार अधिकारी इंगळे, माने, लकडे, कदम, अरुण दुधमल, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, बाळू पाटील मोरे, श्याम पाटील वानखेडे, गजानन मोरे यांच्यासह आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान शासकीय विश्रामगृह येथे पार पडलेल्या नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शासनाच्या विविध आणि शहरी व ग्रामीण योजनांचा तसेच अतिवृष्टीच्या संदर्भात झालेल्या नुकसानी बाबतही आ. बोंढारकर यांनी आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना आवश्यक असणारी वीज पुरवठा सुरळीत करा. अतिवृष्टीग्रस्त भागाचे पंचनामे तातडी करून पंचनामे दाखल करा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळवून द्या. पांदण रस्त्यावरील अतिक्रमणे काढून शेतकऱ्यांना जाण्या येण्यासाठीचा मार्ग मोकळा करा. ग्रामीण भागात असलेली आरोग्य यंत्रणा कोलमडत असून प्राथमिक आणि उपप्राथमिक केंद्रामध्ये आरोग्य यंत्रणा सक्षम करत तेथे येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना चांगल्या सोयी सुविधा देऊन उपचार करा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या आहेत. शासकीय कामांमध्ये हायगय करून शेतकरी व सर्वसामान्यांची गैरसोय केल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशारही आ.बोंढारकर यांनी या बैठकीत दिला.

# 'यशवंत' मध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची स्पर्धा संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयात पर्यावरणशास्त्र विभागातर्फे माजी प्र–कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार पदवी व पदव्युतर विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेचे उद्घाटन व अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. कविता जी. सोनकांबळे होत्या. यावेळी त्यांनी पर्यावरणपूरक गणपती हे निसर्गाच्या रक्षणासाठी आवश्यक आहेत. मूर्ती मातीची, रंग नैसर्गिक आणि सजावट सेंद्रिय ठेवल्याने जलप्रदूषण आणि प्लास्टिकचा वापर टाळता येतो. असे सण निसर्गस्नेही पद्धतीने साजरे केल्यास पर्यावरणाची हानी न होता संस्कृती जपली जाते, असे अध्यक्षीय भाषणात सांगितले. प्रारंभी प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ.बी.बालाजीराव यांनी केले. अशा वेगवेगळ्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरल्याने नैतिक वापर आणि संसाधनांच्या वापरा मध्ये शाश्वतता सुनिश्चित होते, याविषयी मार्गदर्शन केले.

स्पर्धेमध्ये पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या स्पर्धेत प्रथम प्रेमराज ढवळे, द्वितीय सुमय्या तबसून व तृतीय समीक्षा सावते यांनी पारितोषिक पटकावले. सहभागी विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

सूत्रसंचालन पर्यावरणशास्त्र विभागातील प्रा.अरविंद शिंदे यांनी केले आणि आभार प्रा.कांचन पांचाळ यांनी मानले.

याप्रसंगी संशोधक विद्यार्थी नंदकुमार गच्चे, दुग्धशास्त्र विषयाचे प्रा. बाळासाहेब लांडगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अभिनंदन कदम यांनी परिश्रम घेतले तसेच उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, जगन्नाथ महामुने आदींनी सहकार्य केले.

# प्रा. ओमप्रकाश गुंजकर यांचे राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत सुयश



**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत कनिष्ठ महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचे प्रा. ओमप्रकाश नागनाथराव गुंजकर यांना खेलोत्सव पॅरा एडिशन: २०२५ अंतर्गत श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत १०० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये ब्रांझ मेडल प्राप्त झाले आहे.

या राज्यस्तरीय सुयशाबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यमंत्री, नांदेडचे माजी पालकमंत्री व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी. पी.सावंत यांनी पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला आणि भविष्यातील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड.उदयराव निंबाळकर यांची उपस्थिती होती. या सुयशाबद्दल माजी प्र–कुलगुरु प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे, उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अजय गव्हाणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.कबीर रबडे, पर्यवेक्षिका प्रा. वंदना बदने, क्रीडा संचालक डॉ.मनोज पैंजणे, प्रा.उत्तम केंद्रे, प्रा.आर.एम. टिचकुले, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, डॉ. वीरभद्र स्वामी, प्रा. नरेंद्र कंचटवार, डॉ. भास्कर देशमुख, लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर, डॉ.एकनाथ मिरकुटे, प्रा. सचिन अपस्तंभ, डॉ. मुकेश धर्मले, प्रा. सचिन महिंद्रकर, सेवानिवृत्त वनाधिकारी गोपाळराव गुंजकर, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक किशोर गुंजकर, श्रीकांत गुंजकर आदींनी अभिनंदन केले आहे.

# भोकर नगर परिषदेत विविध सहा हजार देशी वृक्षांची लागवड

## हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान



**भोकर (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत भोकर नगर परिषदेच्या वतीने विविध सहा हजार देशी वृक्षांची वृक्ष लागवड करून नगरपरिषदेला 'हरितमय' करण्यात आले आहे.

शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र वर्ष २०२५ मोहिमेअंतर्गत १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. नगर विकास विभागाच्या १ कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टांपैकी नांदेड जिल्ह्यातील सर्व नगर पालिका, नगर परिषद व नगरपंचायतीच्या क्षेत्रात एकूण ३ लाख ५३ हजार ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामध्ये २२ ऑगस्ट २०२५ रोजी या एकाच दिवशी एकुण ९० हजार वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट निश्चित करून दिले होते. या अनुषंगाने भोकर नगरपरिषद हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियाना मध्ये हिरिरीने भाग घेऊन २२ ऑगस्ट २५ रोजी नगरपरिषदेच्या परिसरात आवळा, जांभूळ, आंबा, जांब, करंजी, गुलमोहर, साग, पिंपळ, कडुलिंब यासारख्या विविध सहा हजार देशी वृक्षांची लागवड करून भोकर नगर परिषद व पूर्ण परिसर हरितमय करण्यात आले.

यावेळी स्वच्छता अभियंता सुशील खिल्लारे, अभियांता अनंत कुलकर्णी, अभियंता गजानन सावरगावंकर, जावेद इनामदार, माधव बोधगिरे, सुनिल कल्याणकर, लेखापाल गुरुनाथ कस्तुरे, सहायक लेखापाल सुदर्शन शिंदे, नगर अभियंता सुशील खाडे, करनिर्धारक मोनाली रावते, संगणक अभियंता प्रिया बारसे, रवी महाबळे, सूरज अरपल्ले, सचिन वैष्णव, सुरेश मेहनतकर, संदेश दांडगे, दत्ता आनंतवार, महेश दरबस्तरवार, त्रिरत्न कावळे, संजय पावर, बालाजी कल्याणकर, दिलिप देवतुळे, नारायण आदेवाड, शेख मगदूम आदींसह कार्यालयातील अधिकारी, स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नालीवरील स्लॅब तुटल्याने रस्त्यावरून वाहने जाणे झाले अवघड; कुंडलवाडी नगरपालिकेचे दुर्लक्ष



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** शहरातील राम मंदिर परिसरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या नालीवरील स्लॅब काही दिवसांपूर्वी कोसळला असून त्यामुळे रस्त्याचा एक भागाकडून जावे लागत आहे. या ठिकाणी स्लॅब पडल्याने नागरिक व वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या मार्गावरून दुचाकी, चारचाकी तसेच पादचारी यांची मोठी वर्दळ असते. मात्र, नालीवरील स्लॅब तुटल्याने अपघाताचा धोका कायम आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनधारकांना हे ठिकाण धोकादायक ठरत असून कधीही मोठी दुर्घटना घडू शकते. स्थानिक नागरिकांनी अनेकदा कुंडलवाडी नगरपालिकेकडे तक्रारी करूनही अद्याप दुरुस्तीचे काम हाती घेतले गेलेले नाही. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

नालीवरील स्लॅब तातडीने बसवून रस्ता सुरळीत करावा, अन्यथा या भागातील आंदोलनाचा मार्ग अवलंबवावा लागेल असा इशारा नागरिकांना दिला आहे.

# पोलीस उपअधीक्षक दीपक वाघमारे यांना यांचा



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्याचे सुपुत्र दीपककुमार वाघमारे यांना राष्ट्रपती पुरस्कार जाहीर झाला असून त्यांची नुकतीच पोलीस उपअधीक्षकपदी पदोन्नती झाली. यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.

पोलीस उपअधीक्षक दीपक वाघमारे हे सध्या सेलू येथे कार्यरत आहेत. राष्ट्रपती पुरस्कार जाहीर झाला त्याबद्दल त्यांचा दलित मित्र रामराव सुर्यवंशी, गटशिक्षण अधिकारी केशव मेकाले, चंद्रकांत मेकाले, मुक्ताई नर्सिंग कॉलेजचे संस्थाचालक लालबाजी घाटे, बालाजी जांबकर व गना वाघमारे यांची उपस्थिती होती.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**लोहा (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पारडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रतिनिधी गोविंद डिकळे तर प्रमुख पाहुणे म्हणून जारिकोटे, माजी सरपंच संभाजी पवार, माजी सरपंच दिगंबर डिकळे, व्यंकटराव मोरवले, शिवराज पवार, उत्तम महाबळे, बालाजी कदम, तुकाराम पवार, हानमंत पवार, राहुल डिकळे, जयसिंग गायकवाड यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना जारिकोटे म्हणाले की, अण्णाभाऊंनी कथा, कादंबरी, लोकनाट्य, लावणी, पोवाडे, शेकडो गाणी निर्माण केली. समाजाच्या शोषीत पिडीतांच्या संदर्भात काम केले.खुप संघर्ष केला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचे फार मोठे योगदान आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी नवनाथ वाघमारे, नारायण वाघमारे, प्रकाश वाघमारे, प्रल्हाद वाघमारे, हानमंत धडेकर, लक्ष्मण धडेकर, माधव वाघमारे, केशव शिंदे, संभाजी धडेकर, बालाजी वाघमारे,बाबू वाघमारे, दिगंबर धडेकर, राजीव धडेकर, जळबा धडेकर, कचरू धडेकर, माधव धडेकर आदींसह ग्रामस्थ, महिला पुरुष, युवक, बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी उद्याच्या मोर्चामध्ये सहभागी व्हावे –बाळासाहेब चौधरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समिती जिल्हा शाखा नांदेडच्यावतीने, उद्या गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड रॅलीद्वारे धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव बाळासाहेब चौधरी, जिल्हाध्यक्ष इंजि. माणिक जी. गिरगावकर, तसेच इतर सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद नांदेड तसेच महानगरपालिका नांदेड येथील विविध संवर्गातील हजारो कर्मचारी गेल्या १५ ते २० वर्षापासून कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करावे यासाठी कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा आंदोलने केले, त्यामुळे शासनाने १४ मार्च २०२४ रोजी एक जीआर काढून, ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दहा वर्षे व त्यापेक्षा जास्त झालेले आहे अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात येईल. परंतु जवळपास दीड वर्ष कालावधी संपून सुद्धा अद्यापपर्यंत कर्मचाऱ्यांचे समायोजन झालेले नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी सुद्धा, दहा वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याचा निर्णय दिलेला आहे. परंतु न्यायालयाच्या निकालाची सुद्धा अंमलबजावणी शासनाने केलेली नाही. म्हणजेच शासनाने न्यायालयाचाही अवमान केलेला आहे. त्यामुळे शासनाला पुन्हा एकदा जागे करण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

# मारतळा येथील जिल्हा परिषद शाळेत आ. चिखलीकर रमले




**लोहा (प्रतिनिधी)–** दैनंदिन कामाचा व्याप, अभ्यंगताची गर्दी, कार्यक्रमाची लगबग यातून वेळ काढत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर मारतळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गेले. त्यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज केले. शाळेत राबविण्यात येत असलेल्या सुंदर हस्ताक्षर उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी अचानक मारतळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे धावती भेट दिली एरवी नाव ऐकून असलेले आणि नेहमीच बॅनरवर फोटोत पाहिलेले आ.चिखलीकर प्रत्यक्ष आपल्या शाळेत आणि वर्गात आलेले पाहून विद्यार्थ्यांना सुखद धक्का बसला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

आ. चिखलीकरांनी यावेळी शाळेसाठी दोन संगणक देण्याचे जाहीर केले व तात्काळ पत्र येण्याचे संबंधितांना सुचना केल्या.

तसेच यावेळी त्यांनी शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शाळेला कोणत्या गरजा आहेत. याविषयी त्यांनी मुख्याध्यापक रवी ढगे यांच्याकडून विचारणा केली. मागील काळात आ. चिखलीकर यांनी शाळेस एक प्रोजेक्टरही भेट दिला होता. ग्रामीण भागातील शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी आमदार चिखलीकर हे नेहमीच प्रयत्नशील असतात, हे पुन्हा अधोरेखित झाले. यावेळी माजी सभापती बालाजी पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव सावळे, गणेश उबाळे, केरबा पाटील, गुंडोजी पाटील, सुरेश ढगे येळीकर, स्वप्निल इंगळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश ढेपे, मुख्याध्यापक रवी ढगे, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगाव शहरात रक्तदान शिबीर



**नायगाव (प्रतिनिधी)–** दिवंगत माजी आ. बळवंतराव पाटील चव्हाण व स्व. खा. वसंतराव पाटील चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचे औचित्य साधून नायगाव शहरातील डॉक्टर असोसिएशनच्यावतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. प्रा. रविंद्र चव्हाण हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, बळवंतराव पाटील. बेटमोगरेकर यांची उपस्थिती होती. तसेच व्यासपीठावर श्रीनिवास पाटील चव्हाण, संजय बेळगे, डॉ. अनिस शेख, डॉ. मधुकर राठोड, भगवानराव लगंडापुरे, नगरसेवक पंकज चव्हाण हे उपस्थित होते.

यावेळी गावातील नागरिक, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भव्य रक्तदान शिबिरात डॉ. दत्तात्रय शिंपाळे, डॉ. गुलाबराव वडजे, डॉ. विश्वास चव्हाण, डॉ. रमेश रामशेटवार, डॉ. राम डाकोरे, डॉ. कवठेकर, डॉ. गायकवाड, डॉ. संतोष खंडगावकर, डॉ. शिदे, श्रीधर चव्हाण यांनी पुढाकार घेतला होता.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# पपईच नाही तर त्याच्या पानांमध्येही आरोग्याचा खजिना !



**पपई हे एक असे फळ आहे जे केवळ पोटासाठीच फायदेशीर नाही तर सौंदर्य वाढविण्यास देखील मदत करते. म्हणजेच, त्याचे त्वचेसाठीही अनेक फायदे आहेत. आता हे पपईच्या फायद्यांबद्दल आहे, पण तुम्हाला माहिती आहे का की पपईची पाने पपईइतकीच फायदेशीर आहेत. अशा परिस्थितीत, पपई व्यतिरिक्त, तुम्ही पपईच्या पानांचे सेवन करून चांगले आरोग्य मिळवू शकता. ज्याप्रमाणे पपईमध्ये अनेक पोषक घटक असतात, त्याचप्रमाणे पपईच्या पानांमध्येही अनेक पोषक घटक असतात. याशिवाय, त्यात आढळणारे अँटीऑक्सिडंट्स आणि बायोॲक्टिव्ह कंपाउंड अनेक आरोग्य फायदे देतात. पपईच्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, सी, के, बी, कॉम्प्लेक्स देखील असतात.**

## पपईच्या पानांचे पाणी कसे बनवायचे ?

सर्वप्रथम, ५ ते ६ पपईची पाने घ्या आणि ती धुवून त्यांचे लहान तुकडे करा. नंतर २ ते ३ कप पाणी उकळवा. पाणी उकळू लागले की, त्यात पाने घाला आणि किमान १० मिनिटे चांगले उकळू द्या. पाणी हिरवे झाले की, ते थंड होण्यासाठी बाजूला ठेवा. थंड झाल्यावर, एका कपमध्ये पाणी गाळून घ्या. तुम्हाला हवे असल्यास, चवीसाठी तुम्ही त्यात मध किंवा लिंबाचा रस घालू शकता कारण पपईच्या पानांना कडू चव असते. तुम्ही हे पेय आठवड्यातून ३ वेळा पिऊ शकता.

## यकृतासाठी फायदेशीर

पपईच्या पानांमध्ये एसीटोजेनिन असतात जे यकृताला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करतात आणि विषारी पदार्थ, औषधे आणि जास्त प्रमाणात मद्यपानामुळे होणाऱ्या नुकसानापासून देखील संरक्षण करतात. ही संयुगे हानिकारक टाकाऊ पदार्थ काढून टाकून आणि यकृताची पुनर्जन्म करण्याची क्षमता सुधारून यकृताचे कार्य वाढवतात.

- रोगांचा धोका कमी होईल : पपईच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई आणि अनेक फ्लेव्होनॉइड्स आढळतात जे शरीराला ऑक्सिडेटिव्ह ताण आणि पेशींच्या नुकसानापासून वाचवतात. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स हृदयरोग, मधुमेह आणि काही प्रकारच्या कर्करोगासारख्या अनेक जुनाट आजारांचा धोका देखील कमी करतात.
- पोटासाठी फायदेशीर : जर तुम्हाला पोटाच्या समस्या असतील तर तुम्ही पपईच्या पानांचे पाणी पिऊन या समस्येपासून मुक्त होऊ शकता. यामुळे तुमचे आतडे निरोगी होतील आणि पोटाचे आजार जसे की पोटफुगी, बद्धकोष्ठता, आयबीएस इत्यादींपासून आराम मिळेल.
- दाह-विरोधी गुणधर्म : तुम्हाला माहिती आहे का की संधिवात, दमा आणि ऑटोइम्यून विकार हे सर्व जळजळीमुळे होतात आणि या आजारांपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही पपईच्या पानांचे पाणी पिऊ शकता. कारण त्यात अल्कलॉइड्स आणि फ्लेव्होनॉइड्स सारखे दाह-विरोधी संयुगे असतात जे शरीरातील जळजळ कमी करण्यास मदत करतात.
- रक्तातील साखर नियंत्रित



राहील : मधुमेहाच्या रुग्णांसाठी पपईच्या पानांचा रस पिणे खूप फायदेशीर ठरू शकते. पपईची पाने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्याच्या आणि रक्तातील साखरेची पातळी सुधारण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जातात. पपईच्या पानांचे अर्क उपवास करून रक्तातील साखरेची पातळी कमी करतात आणि एकूणच ग्लुकोज चयापचय देखील सुधारतात असे म्हटले जाते.

# पोट साफ होत नसेल तर दह्यात मिसळून खा ३ गोष्टी

## बद्धकोष्ठता मुळापासून दूर होईल, आतडेही स्वच्छ होतील...

**आपले शरीर योग्यरित्या कार्य करण्यासाठी, आपले पोट पूर्णपणे स्वच्छ करणे महत्वाचे आहे. पोटाशी संबंधित समस्यांमुळे इतर अनेक आजार देखील होऊ शकतात. अशा परिस्थितीत आपली पचनसंस्था मजबूत राहणे महत्वाचे आहे. आजकाल बहुतेक लोकांना बद्धकोष्ठतेची समस्या असते आणि याची अनेक कारणे असू शकतात, जसे की कमी पाणी पिणे, अन्नात फायबरची कमतरता, चिंता, ताण इ. बद्धकोष्ठतेमुळे आपले दैनंदिन जीवन देखील विस्कळीत होते. पोट नीट साफ न झाल्यामुळे अनेकांना चिडचिडही होते आणि त्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींवरही परिणाम होतो.**



कधीकधी कमी खाल्ल्यानेही अशक्तपणा येतो. जर पोटातील घाण नीट बाहेर पडत नसेल तर त्यामुळे गॅस, फुगणे, उलट्या आणि आम्लता यासारख्या अनेक समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत पोटात गॅस तयार झाल्यामुळे भूक कमी लागते आणि डोकेदुखी देखील होते. जर बद्धकोष्ठतेवर योग्य वेळी उपचार केले नाहीत तर ही समस्या गंभीर होऊ शकते. जर तुम्हालाही अशा पोटाशी संबंधित समस्या असतील आणि तुम्ही त्यावर घरगुती उपाय शोधत असाल तर येथे आम्ही तुम्हाला काही घरगुती उपाय सांगणार आहोत, ज्यामुळे दररोज सकाळी तुमचे पोट चांगले स्वच्छ होईल. घराच्या स्वयंपाकघरात अशा काही गोष्टी असतात, ज्या जर दह्यात मिसळून खाल्ल्या तर तुम्हाला खूप फायदा होईल.

### दह्याचे फायदे

दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स पचन सुधारतात. ते बद्धकोष्ठता, गॅस आणि आम्लता यासारख्या समस्यांपासून आराम देते. दह्यामुळे पोषक तत्वांचे शोषण देखील वाढते आणि पोटातील चांगल्या बॅक्टेरियांना देखील चालना मिळते. ते आतडे मजबूत करते आणि पोट देखील योग्यरित्या स्वच्छ होते.

- चांगल्या पचनासाठी ओवा खा : पोटासाठी ओवा खूप फायदेशीर मानला जातो. जर ओवा दह्यासोबत खाल्ला तर लवकरच पोटाशी संबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळेल. यासाठी अर्ध्या वाटी दह्यात एक चमचा ओवा पावडर आणि चिमूटभर काळे मीठ मिसळून खा. हे खाल्ल्याने तुमचे पचन सुधारेल आणि तुमचे पोटही सहज साफ होईल.
- दह्यात त्रिफळा पावडर घाला : त्रिफळा चूर्ण तीन फळांच्या संयोगाने बनते. यात आवळा, बेहडा आणि हिरडा ही फळे असतात. आयुर्वेदात पोटाशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी त्रिफळा चूर्ण वापरला जाते. कमकुवत पचन, बद्धकोष्ठता, गॅस, पोट गोळा येणे इत्यादी समस्यांवर मात करण्यासाठी हा एक अतिशय प्रभावी उपाय मानला जातो. रात्री झोपण्यापूर्वी दह्यात अर्धा चमचा त्रिफळा चूर्ण मिसळून खा. यामुळे तुमचे आतडे नैसर्गिकरित्या स्वच्छ होतील आणि बद्धकोष्ठतेची समस्या देखील दूर होईल.
- इसबगोल पोटासाठी रामबाण उपाय : युर्वेदात इसबगोल पोटासाठी खूप फायदेशीर मानले जाते. तथापि, पोटाव्यतिरिक्त ते आरोग्यासाठी अनेक फायदे देखील देते. ते रंगाने पांढरट व हलके असते. पोटाच्या आजारांवर विशेषतः बद्धकोष्ठता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. यामध्ये घुलनशील तंतू भरपूर प्रमाणात असतात. मल मऊ करते आणि आतड्यांमध्ये असलेल्या चांगल्या बॅक्टेरियांना प्रोत्साहन देते. बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यासाठी, एक चमचा दह्यात सायलियम घाला आणि ते खा आणि नंतर कोमट पाणी प्या.

### या गोष्टी लक्षात ठेवा

जर तुम्ही बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्त होण्यासाठी दह्याचे सेवन करत असाल तर काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तुम्हाला शिळे दही खाणे टाळावे लागेल. ज्या लोकांना सर्दी आणि खोकल्याची समस्या आहे त्यांनी रात्री काळे मीठ मिसळलेले दही नक्कीच खावे. दह्यासोबत जड आणि तेलकट पदार्थ खाणे टाळावे. जर तुमची समस्या कायम राहिली तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



### बद्धकोष्ठतेची कारणे

- पुरेसे पाणी न पिणे
- फायबरची कमतरता
- कमी शारीरिक हालचाल
- मलविसर्जन रोखणे
- तणाव आणि चिंता
- औषधे

# सकाळी उठल्यावर सर्वात आधी करा ‘या’ ५ गोष्टी !

**लोकांच्या आरोग्याच्या समस्या वाढत असताना ते त्यांची दैनंदिन दिनचर्या खूप गुंतागुंतीची बनवतात. म्हणजेच, तुम्ही त्वचेच्या समस्यांसाठी भरपूर उत्पादने वापरण्यास सुरुवात कराल, जर पोटावरील चरबी वाढत असेल तर तुम्ही सर्व प्रकारचे डिटॉक्स ड्रिंक्स पिण्यास सुरुवात कराल. पण जर आम्ही तुम्हाला सांगितले की तुम्हाला या समस्यांना तोंड देण्यासाठी इतके कष्ट करण्याची गरज नाही तर काय ? हो, तुम्ही सोप्या पद्धतींनीही या समस्यांपासून मुक्त होऊ शकता. जेव्हा तुम्ही तुमची सकाळ सुरू करता तेव्हा हे ५ छोटे उपाय करा, जे एकूण आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. पोषणतज्ज्ञांनी या उपायांबद्दल माहिती दिली आहे. हे केवळ पोट सपाट करण्यास आणि त्वचा सुधारण्यास मदत करत नाहीत. यासोबतच ते हार्मोन्स देखील संतुलित करू शकतात. ते म्हणतात की २१ दिवस हे उपाय करून तुम्हाला स्पष्ट फरक दिसेल.**

## ढोलकीसारखे पोट जाईल आत; त्वचाही काचेसारखी चमकेल



### तुमच्या सकाळच्या दिनचर्येत करा हे बदल

**जर तुम्ही पोटाची चरबी कमी करण्यासाठी, हार्मोनल आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्वचा सुंदर बनवण्यासाठी उपाय शोधून थकला असाल, परंतु ते उपाय काहीही फायद्याचे ठरले नसतील तर पोषणतज्ञांनी सूचवलेले ५ उपाय वापरा. व्यायामशाळेशिवाय आणि कोणत्याही औषधाशिवाय त्यांचा परिणाम दर्शवतात. हे उपाय नियमितपणे करून पाहिल्यास तुम्हाला २१ दिवसांत मोठा फरक दिसू लागेल.**

- मनुका आणि केशर पाणी : जागे झाल्यावर मनुका आणि केशर पाणी पिल्याने तुमच्या आरोग्यात मोठी सुधारणा होऊ शकते. यासाठी, ६-८ काळे मनुका आणि २ केशर धागे रात्रभर गरम पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी उठल्यानंतर हे पाणी प्या आणि मनुका खा. हे रक्त शुद्ध करते आणि लोह वाढवते, ज्यामुळे त्वचा स्वच्छ होते आणि हार्मोनल आरोग्य सुधारते. याशिवाय, ते नैसर्गिकरित्या पोट सपाट करण्यास देखील उपयुक्त आहे.
- कपालभाती आणि श्वास घेण्याचे व्यायाम : याव्यतिरिक्त, तुमच्या सकाळच्या दिनचर्येत कपालभाती आणि ४-७-८ श्वास घेण्याचे व्यायाम नक्की समाविष्ट करा. दररोज एक मिनिट कपालभाती करा आणि ४-७-८ श्वास घेण्याच्या ३ फेऱ्या करा. हे केल्याने चयापचय गतिमान होते, पेशींना ऑक्सिजन मिळतो आणि कॉर्टिसोल (तणाव संप्रेरक) कमी होते, ज्यामुळे पोटाचा ताण कमी होण्यास मदत होते.
- ड्राय ब्रशिंग : आंघोळीपूर्वी, १ मिनिट ड्राय ब्रशिंग करा. यासाठी, मऊ नैसर्गिक ब्रिस्टल्स असलेला ब्रश वापरा. ब्रशने हलके वरच्या दिशेने स्ट्रोक करा. हे लिम्फॅटिक ड्रेनेजला उत्तेजित करते, म्हणजे सूज कमी होते. यामुळे रक्ताभिसरण देखील सुधारते, ज्यामुळे त्वचा घट्ट होते. इतकेच नाही तर, हा उपाय पोटाची चरबी कमी करण्यासाठी नैसर्गिक डिटॉक्समध्ये देखील मदत करतो.
- एन्झाइम शॉट : याव्यतिरिक्त नाश्त्यापूर्वी एन्झाइम शॉट घेणे देखील तुमच्या आरोग्यासाठी गेम चेंजर ठरू शकते. ते बनवण्यासाठी अर्धा कप पपई, १ चमचा चिया बियाणे आणि चिमूटभर काळी मिरी मिसळा आणि रिकाम्या पोटी खा. हे औषध आतड्यांतील मायक्रोबायोम (हार्मोन संतुलन) मजबूत करते, पचनास मदत करते, पोटफुगी रोखते आणि त्वचेच्या आरोग्यासाठी दाहक-विरोधी आहे.
- मॉर्निंग जर्नलिंग : पाचवा उपाय म्हणजे जर्नलिंग करणे. दररोज सकाळी, डायरीमध्ये एक गोष्ट लिहा ज्यासाठी तुम्ही कृतज्ञ आहात, दिवसाचे मुख्य ध्येय आणि हसण्याचे कारण सांगा. मॉर्निंग जर्नलिंग तुमची मानसिक स्थिती सेट करते, भावनिक खाणे दूर ठेवते आणि मूड नियंत्रित करणारे हार्मोन्स संतुलित करते.

# जास्त वेळ बसण्याची सवय धूम्रपानाइतकीच हानिकारक



### जास्त वेळ बसल्याने होणारे नुकसान

- उच्च रक्तदाब
- मधुमेह
- हृदयरोग
- कर्करोग
- वाकून बसल्यामुळे पाठदुखी
- वाईट पोश्चरेशन
- रक्ताभिसरण कमी होणे
- कमकुवत स्नायू आणि कडकपणा
- नैराश्य आणि चिंता

**बसताना आपण चालण्यापेक्षा किंवा उभे राहण्यापेक्षा कमी ऊर्जा वापरतो. अनेक लोकांना ऑफिसमध्ये, कारच्या मागे, टीव्हीसमोर इत्यादी बराच वेळ बसण्याची सवय असते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, जास्त वेळ बसल्याने आरोग्याशी संबंधित अनेक धोके निर्माण होतात. कमी बसणे आणि जास्त चालणे आरोग्य चांगले ठेवते. तज्ञ म्हणतात की दर ३० मिनिटांनी बसण्यापासून ब्रेक घ्यावा.**



### दीर्घकाळ बसणे धूम्रपानासारखे

जास्त वेळ बसण्याची सवय आपल्या शरीराचे धूम्रपानासारखेच नुकसान करते. ज्याप्रमाणे धूम्रपान हळूहळू आपले शरीर आतून पोकळ करते, त्याचप्रमाणे जर तुम्ही जास्त वेळ बसलात तर तुम्हाला आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांनी वेढलेले आढळाल.

### या टिप्स फॉलो करा

जर तुम्ही ७ ते ८ तास काम करत असाल तर तुम्ही लहान व्यायाम करून तुमचे आरोग्य तंदुरुस्त ठेवू शकता. जर तुमच्या जवळ एखादा बार असेल तर त्यावर लटकून राहा आणि शक्य तितका वेळ लटकत राहा. लटकण्यापेक्षा चांगले काहीही नाही. एका अभ्यासात असे आढळून आले आहे की जे लोक दिवसातून 8 तासांपेक्षा जास्त वेळ बसून राहतात आणि शारीरिक हालचालींसाठी कमी वेळ देतात त्यांचे कोलेस्ट्रॉल आणि बीएमआय चांगले नसते. या अभ्यासाच्या निकालांच्या आधारे, संशोधकांनी लोकांना असे सुचवले आहे की कामाच्या दरम्यान विश्रांती घेणे आणि शारीरिक हालचाली वाढवणे खूप महत्वाचे आहे.

### चांगली जीवनशैली स्वीकारा

फिटनेस राखण्यासाठी आपण चांगली जीवनशैली स्वीकारली पाहिजे. निरोगी आहारासोबतच चांगली झोप देखील आवश्यक आहे. ती आपल्याला सक्रिय ठेवते. जर तुमच्या कामासाठी एकाच ठिकाणी बराच वेळ बसावे लागत असेल, तर मध्येच ब्रेक घ्या. शक्य असल्यास, जेवणानंतर, फिरायला जा किंवा खुर्चीवर बसून केलेले व्यायाम करा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही फक्त १० मिनिटे काढून छोटे व्यायाम देखील करू शकता.

# 90% लोकांना माहीत नाही गोड खाण्याची योग्य वेळ कोणती?

बहुतेक लोकांना जेवणानंतर गोड खाणे आवडते आणि असेही म्हटले जाते की जेवणानंतर काहीतरी गोड खावे. पण जेवणानंतरच गोड खाणे योग्य आहे की जेवणापूर्वी खावे. हा प्रश्न अनेकदा लोकांच्या मनात येतो. जेवणानंतर गोड खाल्ल्याने पचनक्रिया चांगली राहते असे म्हटले जाते.

प्रसिद्ध डॉक्टरांच्या मते, गोड पदार्थांमध्ये प्रत्यक्षात कार्बोहायड्रेट्स असतात, म्हणून जेव्हा आपण जेवणानंतर ते खातो तेव्हा ते पचन प्रक्रिया मंदावते. जेव्हा आपण जड काहीतरी खातो तेव्हा हायपोग्लाइसेमियामुळे रक्तदाब खूप कमी होतो, जो खूप धोकादायक असू शकतो. हा धोका टाळण्यासाठी, जेवणानंतर गोड पदार्थ खाल्ले जातात. तथापि, आरोग्य तज्ञ म्हणतात की जेवणापूर्वी गोड खावे की नंतर खावे याचे कोणतेही उत्तर नाही. कारण ते आपल्या आरोग्याच्या उद्दिष्टांवर आणि शरीर साखर कशी हाताळते यावर अवलंबून असते.

तज्ञांच्या मते, जर तुम्ही निरोगी आणि संतुलित आहार घेत असाल, तर त्यानंतर गोड खाणे तुमच्यासाठी चांगले आहे. जर तुम्ही जेवणापूर्वी गोड पदार्थ खात असाल तर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढू शकते. विशेषतः जर तुम्ही रिकाम्या पोटी गोड पदार्थ खात असाल तर ते तुमच्यासाठी अधिक हानिकारक ठरू शकते. पुरेशा प्रमाणात पाणी प्या. मर्यादित प्रमाणात काहीही खाल्ल्याने त्याचे नकारात्मक परिणाम कमी होण्यास मदत होते. जर तुम्हाला गोड पदार्थ खाण्याची आवड असेल तर तुम्ही कधीकधी त्याचा आनंद घेऊ शकता, परंतु तुम्हाला त्याचे प्रमाण नियंत्रित करावे लागेल. याशिवाय, जर तुम्ही जेवणानंतर गोड पदार्थ खाल्ले तर ते तुमच्या आरोग्यासाठी चांगले राहील. डॉक्टरांच्या मते, नियंत्रण आणि वेळेमुळे तुमच्या आरोग्यात मोठा फरक पडू शकतो.

# ‘व्हिजन डॉक्युमेंट’मध्ये जनसामान्यांच्या संकल्पनांचे प्रतिबिंब असावे -मुख्यमंत्री



**मुंबई–** राज्याला २०४७ पर्यंत ‘विकसित महाराष्ट्र’ करण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांचा समावेश असलेले व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येत आहे. यासाठी जनतेच्या संकल्पना जाणून घेण्यात आल्या असून यामध्ये चार लाखापेक्षा जास्त नागरिकांनी आपला सहभाग नोंदविला आहे. हे व्हीजन डॉक्युमेंट जनसामान्यांच्या संकल्पनांचे प्रतिबिंब असावे. भविष्यामध्ये कुठलीही योजना, उपक्रम किंवा निर्णय घेताना व्हिजन डॉक्युमेंट समोर ठेवून घेता आले पाहिजे, असे व्हिजन डॉक्युमेंट पथ-दर्शी ठरावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

सह्याद्री अतिथिगृह येथे विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट प्रारूप मसुदा सादरीकरण बैठकीचे आयोजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वित्त व नियोजन राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ध्येय निश्चित असल्यानंतर ध्येयप्राप्ती करण्याचा मार्गही प्रशस्त होतो. त्या दृष्टिकोनातून विकसित महाराष्ट्र ध्येयपूर्तीसाठी या ‘व्हीजन डॉक्युमेंट’च्या माध्यमातून हा मार्ग तयार होत आहे. राज्याला केवळ देशातच नाही, तर जागतिक पा-तळीवर सर्वोत्कृष्ट करण्यासाठी या ‘व्हीजन डॉक्युमेंट’ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी व्हावी. प्रत्येक विभागाने ठेवलेली ध्येय निश्चिती प्राप्त होण्यासारखी आहे. यासाठी यंत्रणांनी आधुनिक तंत्रज्ञान, नवनवीन संकल्पना आणि या क्षेत्रातील जगातील सद्यस्थिती लक्षात घेऊन कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

सर्वसामान्य जनतेने या डॉक्युमेंटच्या निर्मितीसाठी घेत-लेला सक्रिय सहभाग त्यांची राज्याच्या विकासाप्रती असलेली भावना अधोरेखित करीत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी सहभाग घेतलेल्या जनतेचे आभार मानले. एका सखोल विचार प्रक्रियेतून हे व्हिजन डॉक्युमेंट तयार होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य संपूर्ण विकसित होण्यासाठी राज्यासमोर असलेली आव्हा-ने व्हीजन डॉक्युमेंट निर्मितीच्या अनुषंगाने समोर आली आहेत. हा मार्ग खडतर जरी असला, तरी अशक्यप्राय नाही, हे सुध्दा यातून स्पष्ट झाले आहे. विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून समोर येणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

बैठकीत कृषी, नगर विकास, गृह, सांस्कृतिक कार्य, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, पर्यटन, सामान्य प्रशासन (सेवा), परिवहन व बंदरे, सार्वजनिक बांधकाम या विभागांचे सादरीकरण झाले.

बैठकीला अपर मुख्य सचिव (गृह) इकबाल सिंग चहल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खार-गे, अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) व्ही राधा, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे) संजय सेठी, प्रधान सचिव (पर्यटन)अतुल पाटणे, प्रधान सचिव (कृषी) विकासचंद्र रस्तोगी, सचिव (सार्वजनिक आरोग्य) डॉ. विनायक निपुण आदी उपस्थित होते.

## दोन गटात तुफान राडा

**छत्रपती संभाजीनगर:** शहरातील राजा बाजार कुंवारफल्ली परिसरामध्ये जुन्या वादातून दोन गट आमने-सामने आले. दोघांमध्ये तुफान हाणामारी झाली. यातील काही तरुणांनी थेट धारदार शस्त्र उपसली. ज्यामध्ये तलवारींचा देखील समावेश होता. यामुळे परिसरात काही काळ तणावाच वातावरण निर्माण झालं होतं.

या प्रकरणी पोलिसांना माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, घटनास्थळावरून आरोपी पसार झाले. एक तलवार ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हा संपूर्ण प्रकार शनिवारी मध्यरात्री घडला.

छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती भाग म्हणून राजाबाजार कुंवारफल्ली याला ओळखलं जातं. गेल्या काही दिवसांपासून या भागातील दोन गट सातत्याने समोरासमोर येत आहे. जुन्या वादातून या दोन्ही गटांमध्ये संघर्ष सुरू आहे. दरम्यान, शनिवारी रात्री दोन वाजेच्या सुमारास जुन्या वादाच्या कारणावरून हे दोन्ही गट पुन्हा आमने-सामने आले. दोन्ही गटातील कार्यकर्त्यांनी एकमेकांना शिवीगाळ केली. त्यानंतर थेट लाठ्या-काठ्याने मारहाण सुरु झाली.

## सामान्य विद्यार्थ्यालाही सैनिकी शाळांमध्ये शिक्षणासाठी सकारात्मक निर्णय घेणार -शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई–**राज्यातील सामान्य विद्यार्थ्यालाही सैनिकी शाळांमध्ये तसेच राष्ट्रीय इंडियन मिलिट्री कॉलेजसारख्या संस्थांमध्ये शिकता यावे यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. यासाठी सैनिकी शाळांना केंद्र व राज्य शासनामार्फत देण्यात येणारा निधी, विद्यार्थी संख्या आणि शुल्क यासंदर्भात अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजना व उपक्रमांसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. बैठकीस शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, ‘एससीआरटीई’चे संचालक राहूल रेखावार हे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. सहसचिव सर्वश्री ताशिलदार, समीर सावंत, उपसचिव तुषार महाजन यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले की, सैनिकी शाळांमध्ये राज्यातील सामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी, त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा भार स्वीकारण्यासंदर्भात सकारात्मक अहवालाअंती निर्णय घेण्यात येईल. या निर्णयामुळे राज्यातील सामान्य विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकेल.

पुण्यातील मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर येथे शिक्षण आयुक्तालयाच्या बांधकामासंदर्भातही यावेळी आढावा घेण्यात आला. डिसेंबरपर्यंत या इमारतीचे बांधकाम पर्यावरणपूरक, ऊर्जा बचत करणारे, शाश्वत विकासाला हातभार लावणारे, प्रदूषण कमी करणारे, अशा प्रकारे पूर्ण करावे. सेंटर ऑफ एक्सलन्स संदर्भात सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा, चर्नी रोड येथील बालभवनचे बांधकाम त्याचे ऐतिहासिक महत्व राखून सप्टेंबरपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमात सुधारणा

**मुंबई–**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये चार सुधारणा व दोन नवीन कलमांचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास आणखी कठोर शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्त व्यवस्थांचे नियमन व त्यांच्या कारभारावर नियंत्रणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मध्ये करण्यात आला आहे.


### टी.सी., मार्कमेमो हरवला आहे

माझी गन्लेवार सुशीलकुमार गुंडेराव या नावाची एम.एस्सी. (अॅग्री) पासची टी. सी. व बी. एस्सी. (अॅग्री) पासचा मार्कमेमो पावडेवाडी नाका ते शिवाजीनगर दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

–संपर्क पत्ता–
रा. फरांदेनगर नांदेड
मो. ९६८९१२४८४६


कार्यालय

## जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

जाहीर प्रगटन

**उम्मदी अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणे बाबत.**

**वक्फ संस्थेचे नाव–वक्फ संस्था दिनी मदरसा व मस्जिद हजरत उमर फारुख (रजि.) लेबर कॉलोनी, नांदेड ता. जि. नांदेड**

**उपरोक्त वक्त संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास नोंदणीकृत असून, अर्जदार श्री सय्यद अलीम अहेमद पिता सय्यद रफीक अहेमद व इतर (४) लोकांनी दि. २९/०८/२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ (५) वर्षाचा असून, व्यवस्थापन समिती निवडीची रिक्त निवडणुकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री सय्यद अलीम अहेमद पि. सय्यद रफीक अहेमद | अध्यक्ष |
| २. | श्री सोएब खान पि. जांगीर खान | उपाध्यक्ष |
| ३. | श्री महेमूद खान पठाण पि. हसन खान पठाण | सचिव |
| ४. | श्री सय्यद साबेर सय्यद अली | सहसचिव |
| ५. | श्री शेख एकबालोद्दीन शेख खमरोद्दीन | खजिनदार |
| ६. | श्री अब्दुल वाजीद पि. अब्दुल मजीद | सदस्य |
| ७. | श्री सिराज खान रहीम खान पठाण | सदस्य |
| ८. | श्री सय्यद मोसीन सय्यद उस्मान | सदस्य |
| ९. | श्री खाजा खान पि. रहीम खान | सदस्य |

**सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय नांदेड, पत्ता– मजीद जुनी दर्गाह नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे. विहित वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही.**

**मो. मोतासिम अन्सारी**
**जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की हिमायतनगर शिवारातील शेत सर्वे न.१६५/१ क्षेत्रफळ १ हेक्टर ७५ आर आकार ३ छ ४३ पैसे असून सदर जमीन ही लक्ष्मीबाई भ्र. नागोराव नरवाडे रा. हि.नगर यांचे कडून शे. वहीद शे. रब्बानी रा. हिमायतनगर यांनी कायम खरेदी करण्याचा लेखी करार/सौदा केला आहे, सदर जमिनी संबंधी कोणास आक्षेप व उजर हित संबंध असल्यास १५ दिवसाच्या आत उजर दाखल लेखी पुराव्या सहित द्या नसता कोणाचे म्हणणे नाही असे गृहीत धरून खरेदी विक्रीचे कायदेशीर व्यवहार पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी व सदर जमिनीची चतुर्सिमा पूर्वेस-सवना रोड, पश्चिमेस-जरीना बी शेख नईम यांची शेत जमीन आहे. दक्षिणेकडे पांदण रस्ता आहे, उत्तरेस-प्रकाश नरवाडे यांचे शेत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**शेख वाहिद शेख रबानी**
**हिमायतनगर, जि. नांदेड**

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली
ता. बिलोली यांचे कार्यालय
प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.
अर्ज/आवक क्र. ३६३९/२०२५

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार श्रीयोग दत्तात्रय साखरे, वय २४ धंदा- शिक्षण रा. पिंपळगांव कु. ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११ (२) व (३) अन्वये दि. ३१/०७/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्रीयोग दत्तात्रय साखरे, रा. पिंपळगांव कु. ता. बिलोली यांचा जन्म दि. ०७/०८/२००१ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगांव ता बिलोली जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, श्रीयोग दत्तात्रय साखरे, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

## Change In Name

My old Name is MOHAMMED SAGEERUDDIN Which now I am Changing as New Name MOHAMMED SAGIRUDDIN Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address- S/O MOHAMMED QUDIRUDDIN GANJ OLD GANG ITWARA, NANDED
Mo. No. 9860357277

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली**
**ता. बिलोली यांचे कार्यालय**
**प्रकरण जन्म नोंद घेणे बाबत.**
**अर्ज/आवक क्र. ३२९०/२०२५**

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार नामे हणमंत मोतीराम चोपवाड, वय २२ धंदा-शेती रा. बेळकोणी बु., ता. बिलोली जि. नांदेड यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म, मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये दि. १५/०७/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार हणमंत मोतीराम चोपवाड, वय २२ धंदा-शेती रा. बेळकोणी बु., ता. बिलोली जि. नांदेड यांचा जन्म दि.०९/०२/२००३ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय बेळकोणी बु. ता. बिलोली, जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, नामे हणमंत मोतीराम चोपवाड, वय २२ धंदा-शेती रा. बेळकोणी बु., ता. बिलोली जि. नांदेड यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

## जाहीर पत्रक

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७३/२०२५
पुढील तारीख – ११.०९.२०२५

अर्जदार : १. मनेश पि. पांडूरंग उप्पलवार, वय-४९ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड. सध्या रा. माया निवास, प्लॉट क्र. १०५ जी १०४ राजेश नगर सहारा सिधी जवळ सातारा परिसर देवलाई छत्रपती संभाजी नगर. ०२. संतोष पि. पांडूरंग उप्पलवार, वय – ५५ वर्षे, धंदा- नोकरी, रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड. सध्या रा. प्लॉट क्र०२ इंदत्रकमल कॉम्प्लेक्स विनायक नगर त्रीमुर्ती चौक छत्रपती संभाजी नगर. ३. सुभाष पि. पांडुरंग उप्पलवार, वय – ५४ वर्षे, कामधंदा – नोकरी रा. बिलोली ता. बिलाली जि. नांदेड. सध्या रा. घर क्र. ६५-६६ सर्व्हे क्र. ६९ प्रभूनगर एन – २ सिडको संत तुकाराम नगर एरिया छत्रपती संभाजी नगर.

विरुध्द
निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हे मयत कै. पांडुरंग पि. गंगाधरराव उप्पलवार व कै. वनमाला भ्र. पांडुरंग उप्पलवार यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदारांचे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हे मयत कै. पांडुरंग पि. गंगाधरराव उप्पलवार व कै. वनमाला भ्र. पांडुरंग उप्पलवार यांचे मुले असुन मयत कै. पांडुरंग पि. गंगाधरराव उप्पलवार यांचा मृत्यू दिनांक २३.०२.१९९५ रोजी झाला व कै. वनमाला भ्र. पांडुरंग उप्पलवार यांचा मृत्यु दिनांक २०.०६.२०१० रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ यांना मयत कै. पांडुरंग पि. गंगाधरराव उप्पलवार व कै. वनमाला भ्र. पांडुरंग उप्पलवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०८/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

| क. लिपीक | सहा. अधिक्षक |
|---|---|
| दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली | दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली |

## विमुक्तजन शिक्षण प्रसारक मंडळ किनवट संचलित (भाषीक अल्पसंख्याक संस्था)

**सुमतीबाई हेमसिंग नाईक माध्यमिक कन्या विद्यालय, किनवट वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सिंदखेड ता. माहूर जि. नांदेड येथील शिक्षणाधिकारी (मा) यांनी दिलेल्या परवानगी आदेश क्र. जा.क्र. जिपनां/शिविमा/मा-८अ/२०२४-२५/३४११ दि. ०७/०८/२०२५ रोजी नुसार खालील जागा भरणे आहे.**

| अ.क्र. | पदाचे नाव | पद शैक्षणिक पात्रता | पद संख्या | विभाग | अनुदान प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स.शि. | बी.एस.सी.बी.एड. गणित / विज्ञान | ३ | माध्यमिक | १००% अनुदानीत | सेवानिवृत्तीने रिक्त पद |
| २ | स.शि. | बी.ए./एम. ए. इंग्रजी | २ | माध्यमिक | १००% अनुदानीत | सेवानिवृत्तीने रिक्त पद |
| ३ | स.शि. | बी.ए./एम. ए. मराठी | १ | माध्यमिक | १००% अनुदानीत | सेवानिवृत्तीने रिक्त पद |
| ४ | कनिष्ठ लिपीक | बी.ए./बी.एस.सी.. एमएससीआयटी टायपींग मराठी, इंग्रजी ३०/४० | १ | माध्यमिक | १००% अनुदानीत | सेवानिवृत्तीने रिक्त पद |

**टिप : संस्था अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असल्याने बिंदू नियमावलीची गरज नाही तरी गरजू व होतकरू उमेदवारांनी शैक्षणिक प्रमाणपत्राच्या मुळप्रतीसह सुमतीबाई हेमसिंग नाईक विद्यालय, सुभाषनगर किनवट येथे दि. ०३.०९.२०२५ रोजी बुधवार सकाळी ११.०० वाजता स्वखर्चाने उप-स्थित रहावे.**

**अध्यक्ष/सचिव**
**अध्यक्ष/सचिव**
**विमुक्तजन शिक्षण प्रसारक मंडळ, किनवट**
**शालेय समिती**


### टी.सी.हरवली

माझी संध्या गिरगावकर सखारामपंत या नावाची इयत्ता १०वी पासची टी. सी. श्रीनगर ते होळी दरम्यान प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता–** सरपंच नगर मालेगाव रोड नांदेड
**मो.** ८६०००८२५९५


## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

पत्ता : वजीराबाद, नांदेड. दूरध्वनी – (०२४६२) २३४४०४
ई-मेल पत्ता :- infonwmcnanded.org फॅक्स क्र. – (०२४६२) २३२०७१

**ई-निविदा सुचना क्र.नांवाशमनपा/साबांवि/७५४३/२०२५ दि. २५/०८/२०२५**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन वर नमुद निविदा सुचना निहाय कामाकरीता (मनपा निधी व मुलभूत सोयी सुविधा (सी.सी. रस्ते व सी. सी. नाली) इ-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणाली नुसारच ऑनलाईन निविदा मागवित आहेत. (निविदा कागदपत्र https://mahatender.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास उक्त वेबसाईटवर व कार्यालयीन सुचना फलक याद्वारे कळविण्यात येईल.

**अति–आयुक्त,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबान ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नांदेड पोलीस सज्ज -पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार

**नांदेड (प्रतिनिधी)–** गणेशोत्सवा-निमित्त जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नांदेड पोलीस सज्ज आहेत, असे नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.



गणेशोत्सव बंदोबस्त अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे म ार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत ठिकठिकाणी शांतता कमिटीच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत नागरिकांना तसेच प्रत्येक गणेश मंडळांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. यावेळी अबिनाश कुमार बोलत होते.

गणेशोत्सव शांततेत पार पाडावा यासाठी नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाच्या सर्व ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची सर्वो तोपरी काळजी घेण्यात आली आहे. गणेशोत्सव बंदोबस्त कामी नांदेड शहर व ग्रामीण भागातील बंदोबस्ता- करिता पुढीलप्रम ाणे अधिकारी व अंमलदार तसेच होम गार्ड नेमण्यात आले आहेत.

अप्पर पोलीस अधरक्षक-२, उपविभागीय पोलीस अधिकारी -६, पोलीस निरीक्षक ३९, सपोनि-पोउपनि-२०६, पोलीस अंमलदार-३१९५, आरसीपी प्लाटून-५, एसआरपीएफ-१ कम्पनी, क्युआरटी-४८, पोलीस अंमलदार, पुरुष होमगार्ड-१३०० आणि महिला होमगार्ड-२७५, तसेच बाहेरून गणेशोत्सवानिमित्त मागविण्यात आलेला बंदोबस्त पुढील प्रमाणे- पोलीस उपाधीक्षक-२, पोलीस निरीक्षक-६, एसआरपीएफ-१ कंपनी, महामार्ग पोलीस ५० अंमलदार, प्रशिक्षणार्थी पोउपनि-२० अधिकारी, असा बंदोबस्त मागविण्यात आला आहे.

जिल्ह्यामध्ये स्थानिक पोलीस, आरसीपी, एसआरपी व बाहेरून मागविण्यात आलेल्या बंदोबस्ताकरिता आलेले अधिकारी अंमलदार यांचेकडून पथसंचलन (रूटमार्च) काढण्यात आला. दंगा काबू योजना सराव घेण्यात आला. तसेच जिल्ह्यातील शांतता अबाधित राखण्यासाठी एकत्रिक संयुक्तरित्या सर्व पोस्टे स्तरावर सुनियोजित पद्धतीने इतर सुरक्षाविषयक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सव बंदोबस्त अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अबिनाश कुमार यांनी भयमुक्त व डी.जे. मुक्त गणेशोत्सव साजरा करणे बाबत नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे.

# पर्यावरणपूरक व डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## नदी पात्रात विसर्जन न करता कृत्रिम तलावात विसर्जन करून गणेशोत्सव आनंदाने उत्साहात साजरा करा

**नांदेड (प्रतिनिधी)–** उद्यापासून गणपती उत्सवास प्रारंभ होत असून, यावर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक व डीजेमुक्त करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अतिरिक्त म नपा आयुक्त गिरीश कदम, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, डॉ. शंकरराव चव्हाण महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख तसेच विविध संबंधित विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

मनपा, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्यांच्या स्तरावरील कामे दिलेल्या निर्देशानुसार विहित वेळेत पूर्ण करावीत. या वेळेस गणपती विसर्जनाच्या दिवशी जीवरक्षकांची संख्या वाढविण्यात आली असून, स्वयंसेवकांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. तसेच मनपाच्यावतीने तिसऱ्या, पाचव्या दिवशी गणेश मूर्तीचे संकलन करण्यात येणार असून, लहान घरघुती गणपती विसर्जन करण्यासाठी छोटे छोटे पर्यावरणपूरक कुंड तयार करण्यात आले आहेत. नागरिकांनी नदीच्या पात्रात गणपती विसर्जन न करता मनपाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक तलाव व कुंडातच गणपती विसर्जन करुन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

नदीच्या वाहत्या प्रवाहात श्री गणेश मूर्तीचे विसर्जन न करता महानगरपालिकेच्या वतीने विसर्जनासाठी तयार केलेल्या सांगवी, पासदगाव, पुयनी, झरी येथे कृत्रिम तलावाची व्यवस्था केली आहे. याबाबत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मनपाच्यावतीने केले आहे.

**गणेश मंडळांनी डिजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा –पोलीस अधीक्षक**

उद्यापासून गणेशोत्सवास प्रारंभ होत असून, या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्यावतीने पूर्ण नियोजन केले आहे. उत्सव काळात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. पोलीस प्रशासन नेहमी दक्ष असून नागरिकांनी योग्य माहिती द्यावी. नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यांची दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले.

गणेशोत्सव काळात डिजेचा आवाजामुळे मोठे ध्वनी प्रदूषण होते. नागरिकांनी डीजे न लावता गणपती उत्सव साजरा करण्यावर भर देवून डिजे मुक्त गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. याबाबत गणेश मंडळाकडून तसे बंधपत्र घेतले असून कोणीही नियमांचे उल्लंघन करु नये असेही त्यांनी स्पष्ट केले.

# डॉ. शेख मोहम्मद वखिओद्दिन यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर

**अर्धापूर (प्रतिनीधी)–** येथील जि. प. हायस्कूलचे मुख्याध्यापक डॉ. शेख मोहम्मद वखिओद्दिन यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. भारत सरकार शिक्षणविभागाच्यावतीने देशातील ४५ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र सरकारने काढले आहे.



छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड जिल्ह्याला हा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार दहा वर्षानंतर मिळाला आहे. देशातील अत्यंत मानाचा पुरस्कार भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ५ सप्टेंबर शिक्षकदिनी जि. प. हा. मुख्याध्यापक डॉ. शेख मोहम्मद वखिओद्दिन यांना विज्ञान भवन नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख ५० हजार रुपये, रौप्य पदक, गुणवत्तेचे प्रमाणपत्र व प्रशस्तीपत्र असे आहे.

# आ. श्रीजया चव्हाण कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर विधानसभा मतदार संघाच्या भारतीय जनता पक्षाच्या आम दार श्रीजया चव्हाण यांची परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्र विधानसभेच्या प्रतिनिधी म्हणून आमदार श्रीजया चव्हाण यांची नियुक्ती झाली आहे. ही जबाबदारी सोपवल्याबद्दल आ. श्रीजया चव्हाण यांनी वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत.

# महिलेच्या कानातील सोन्याची बाळी पळविली

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील दशमेश हॉस्पीटलसमोर उभ्या असलेल्या एका ७० वर्षीय महिलेच्या कानातील सोन्याची बाळी जबरी चोरून नेल्याचा प्रकार घडला आहे. तसेच आनंदनगर ते व्हीआयपी रस्त्यावर एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन चोरट्यांनी तोडून नेली आहे. तर तिकडे किनवटमधील गोकुंदा भागात घ रफोडून चोरट्यांनी ३० हजारांचा ऐवज लंपास केला आहे.

रविंद्रसिंघ राखासिंघ धुन्ने यांनी दिलेल्या तक्रारीनुसार २४ ऑगस्टच्या रात्री ११.३० वाजेच्या सुमारास उषा बन्सीलाल जुनेजा (वय ७०) या महिला गल्ली क्रमांक ३ मधून एनआरआय निवासकडे जात असताना दशम ेश हॉस्पीटलसमोर असलेल्या अंधाराचा फायदा घेवून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी उषा जुनेजा यांच्या कानातील सोन्याची बाली ४.५० ग्रॅम वजनाची किंमत २७ हजार रुपये बळजबरीने तोडून नेली आहे. वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, सहायक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे तपास करत आहेत.

दुसऱ्या घटनेत जयश्री त्र्यंबक ढवळे या २४ ऑगस्ट रोजी दुपारी २.३५ ते २.४५ वाजेदरम्यान आनंदनगर ते व्हीआयपी रस्त्यावर आपल्या दुचाकी गाडी क्रमांक (एम.एस. २६ सी.डी.४३१५) वर बसून प्रवास करत असताना वसंतनगर येथील मेडिकल समोर पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाची सोन्याची चैन किंमत ६० हजार रुपयांची बळजबरीने तोडून पळून गेले आहेत. शिवाजीनगर पोलीसांनी ही घटना गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक कदम तपास करत आहेत.

# गणेश मंडळांनी प्रसाद वितरणात स्वच्छता आणि नोंदणी संबंधी नियमांचे पालन करावे

## अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळांनी भाविकांना दिला जाणारा प्रसाद स्वच्छ व सुरक्षित राहावा यासाठी आवश्यक त्या खबरदारी घेणे बंधनकारक आहे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

सर्व गणेश मंडळांनी भाविकांसाठी तयार केलेला प्रसाद हा काचेच्या, स्टेनलेस स्टीलच्या भांड्यात किंवा पारदर्शक अन्न श्रेणी प्लॉस्टीकच्या भांड्यात झाकून ठेवावा. जेणेकरून प्रसादाला धूळ, माती, माशा, मुंग्या या इतर किटकांचा प्रादुर्भाव होणार नाही. भाविकांना शिळे अन्न पदार्थ सेवनास देऊ नयेत. प्रसाद हाताळणाऱ्या सर्व व्यक्तीचे कपडे स्वच्छ असावे. प्रसाद हाताळणाऱ्या व्यक्तीने साबणाने/हँड वॉशने हात धुऊनच कामास सुरुवात करावी. प्रसाद हाताळणाऱ्या व्यक्तीने नाक, कान, डोके व केस खाजवणे वा डोळे चोळणे टाळावेत. प्रसाद हाताळणाऱ्या व्यक्तीने शिंकणे व थुंकणे, तंबाखू वा धुम्रपान करणे टाळावे. संसर्गजन्य आजार असणाऱ्या व्यक्तीने प्रसाद बनविणे व हाताळण्याची कामे करु नयेत. प्रसाद हाताळणाऱ्या व्यक्तीची नखे व्यवस्थित कापलेली असावीत व त्यात घाण साचलेली असू नये. गणेश मंडळांनी आवश्यक तेवढाच ताजा प्रसाद विशेषतः दूध व दुग्धजन्य पदार्थापासून तयार केलेला प्रसाद भक्तांना सेवनास देण्यात यावा. शिल्लक प्रसाद योग्य त्या तापमानात साठून ठेवण्यात यावा.

कच्या अन्न पदार्थाचा टाकाऊ कचरा आणि भक्तांना कचरा टाकण्यासाठी झाकण असलेली कचराकुंडी ठेवावी जेणेकरून आजूबाजूचा परिसर स्वच्छ राहील. प्रसाद तयार करण्यासाठीचे भांडी धुण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी पिण्यायोग्य असावे. पिण्याचे पाणी भांड्यात साठवावे, त्यावर झाकण झाकलेले असावे व पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरण करून पिण्यास द्यावे. भांड्याचा वापर करण्यापूर्वी ते भांडी धुण्याच्या साबणाने/द्रावणाने घासून व

# तरोडा नाका परिसरात भाजी विक्रेत्यांना खंजर दाखविणाऱ्या दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या तरोडा नाका परिसरातील भाजी विक्रेत्यांना खंजरचा धाक दाखवून लूटमार करणाऱ्या दोघांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून खंजर आणि दुचाकी जप्त केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मालाविरुद्ध गुन्हे करणारे गुन्हेगार यांचेवर कारवाई करण्याचे आदेश सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना दिले होते. भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या आदेशाने दि. २४ ऑगस्ट रोजी ४ वाजता गुन्हे शोध पथक पेट्रोलींगकामी हद्दीत रवाना झाले असताना गुप्त बातमीदारासमार्फत खात्रिशीर बातमी मिळाली की, जय भवानी चौक, नवीन वाडीजवळ दोन इसम हे संशयीतरीत्या चोरीचे मोबाईल विकण्यासाठी एका मोटारसायकलवर थांबले आहेत. या माहितीवरून त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केल्यानंतर त्यांचे नावे रवी देविदास दुधमल, वय १८ वर्षे, रा. नवीनवाडी नांदेड, सय्यद मुश्ताक पि. सय्यद ईसाक, वय २१ वर्षे, रा. आसरानगर, नांदेड असे सांगितले. त्यानंतर रवी देविदास दुधमल याचे जवळ दोन मोबाईल व एक खंजर, नगदी ३ हजार रूपये, एक पल्सर २२० मोटार सायकल जिचा पासिंग क्रंमाक (चक-२६-१२१७) व सय्यद मुश्ताक सय्यद ईसाक यांच्याकडून एक मोबाईल व हत्यार जप्त केले.

या गुन्ह्यातील एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अभिनंदन केले आहे.

# अवैध वाळू उपसा करणारे वाहन व रेती जप्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या धनेगाव रोडवर वांगी येथून अवैध वाळू एका टिप्पर वाहनाद्वारे रेती घेऊन जातांना १४ लाख ४५ हजार रुपये मुद्देमाल जप्त केला.

नांदेडचे पोलीस अधीक्षक दवणे यांनी ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतूक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने पोनि ओमकांत चिंचोलकर यांचे आदेशान्वये मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २५ रोजी १० वा. सुमारास पोहे शेख इब्राहीम, पोहेकॉ डफडे, शेख आसीफ, पोकॉ शेख जमीर, पोकॉ धम्मपाल कांबळे, सर्व नेमणूक पो.स्टे. नांदेड ग्रामीण असे पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, वांगीकडून चंदासिंग कॉर्नर कडे एक टिप्पर रेती भरून येत आहे अशी माहिती मिळाल्याने वर नमूद अंमलदार असे खाजगी वाहनाने, धनेगाव पेट्रोलपंपासमोर थांबले असता वेळ ११ वाजता वाजेगाव बायपासकडून पांढऱ्या व हिरव्या रंगाचा टिप्पर ज्याचे पासिंग क्र चक २६ ऊ ०९१७ ज्यात



महन ब्रास रेती भरलेला मिळून आल्याने त्यास सदर रेती वाहतूक करण्याचा परवाना विचारला असता त्याचे चालक नामे साईनाथ रामचंद्र करडीले वय २५ वर्षे रा. नागापूर ता. जि. नांदेड यांनी परवाना नसल्याचे सांगितले. सदर हायवा पोलीस स्टेशनला आणून दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून एकूण १४,१५,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करून त्याचे विरुद्ध कलम ३०३(२), भा. न्या.सं. सहकलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोकुंद्यात बस कंडक्टरचे घर फोडले

**किनवट (प्रतिनिधी)–** शहरालगतच्या गोकुंद्यात कुलूपबंद घरफोडीचे सत्र सुरूच आहे. अज्ञात चोरट्यांनी एका बस कंडक्टरचे घर फोडून ३० हजारांचा मुद्देमाल लंपास केला.

गोकुंद्याच्या एकविरा मंदिर परिसरातील उत्तमराव राठोड शाळेजवळ बस कंडक्टर वसंत पिटलेवाड यांचे घर आहे.दि. २३ ऑगस्टच्या सायंकाळी पिटलेवाड कुटुंब घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. ही संधी साधत अज्ञात चोरट्यांनी पिटलेवाड यांच्या घराचे कुलूप, कोंडा तोडला. घरातील कपाटात ठेवलेले रोख १० हजार रुपये व सोन्या, चांदीच्या वस्तू असा ३० हजारांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. याप्रकरणी किनवट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# राजे मधुकरराव देशमुखांनी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक अवकाश समृद्ध केला -इबीतदार

**नांदेड (प्रतिनिधी)–** राजे मधुकरराव देशमुख हे बहुआयामी लेखक होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यांचे शिकार या विषयावरचे लेखन अद्वितीय असून, प्रत्यक्ष जंगलात भटकंती करून त्यांनी हे लेखन केले आहे. राजे देशमुख यांनी केवळ साहित्याच्याच प्रांतात कार्य केले नसून त्यांनी माहूर परिसराचा सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक अवकाश समृद्ध केला, असे प्रतिपादन मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबीतदार यांनी केले. श्री जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या शिकारी लेखक राजे मधुकरराव देशमुख यांच्या विसाव्या स्मृतिदिनानिमित्त उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष



जयकुमार भोपी हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून साहित्यिक देवीदास फुलारी, उद्योजक गजानन मुधोळ पाटील, राजकुमार भोपी, कवयित्री सुधाताई नरवाडकर, कवी बापू दासरी, गुरु-माऊली लक्ष्मीबाई, स्वाती आडे आणि मुक्ता दासरी उपस्थित होते.

प्रारंभी अविनाश सातव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी देवीदास फुलारी म्हणाले, राजे मधुकरराव देशमुख यांचे लेखन हे त्यांच्या प्रत्यक्ष आणि समृद्ध अरण्य अनुभूतीवर आधारित असून, त्यांच्यामधला लेखक आणि त्यांच्यामधला माणूस तेवढाच उंचीचा होता. बापू दासरी यांनी मुलांना संस्काराचे महत्त्व सांगून काही कविता सादर केल्या. स्वर्गीय लेखक बी. रघुनाथ यांची कन्या आणि कवयित्री सुधा नरवाडकर यांनी मुलांना मार्गदर्शन करून दोन कविता सादर केल्या. उद्योगपती गजानन मुधोळ पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मार्गदर्शन केले. स्वाती आडे यांनी विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्व सांगून अभ्यासप्रवण होण्यास सांगितले. ॲड विजयकुमार भोपी यांनी राजे मधुकरराव यांचे व्यक्तिमत्व, त्यांचे शिकारी लेखन आणि त्यांच्या मधला माणूस यावर भाष्य केले. जगदंबा सेवा समिती सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश सातव यांनी केले तर ॲड विजयकुमार भोपी यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, अध्यापक आणि माहूर पंचक्रोशीतील रसिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com